नोंदणी क्रमांक : MAHMAR/2021/82132 | पाने : ४ | वर्ष : ४थे | अंक : १५९ | किंमत : ४ रूपये
Gmail : aklgavakari@gmail.com
Gmail : punegavkari@gmail.com




महाराष्ट्राचे सर्वमान्य दैनिक

# समर्थ गांवकरी

संपादक : डॉ. विश्वासराव आनंदराव आरोटे
POSTAL REGISTRATION NO : SRP/137/2023-2026

दशरथ चव्हाण
मॅनेजिंग डायरेक्टर
आदर्श इंजिनिअरिंग सर्विसेस
जनरेटर विक्री व दुरुस्ती
१५ के व्ही ए पासुन २००० के व्ही ए
Mumbai off.: 203, Kokn Apt., Plot No. 1053,Sector - 5 Land Mark Mayur Bar Hotel, KoparKhairane, Navi Mumbai 400 709.
Mob.: +91-8286562340 / 9004511593/8652653990 /8286562350
Pune Off.: At Post Vadaj, Taluka Junnar, Dist.- 410 502
Email: dasharathschavan@gmail.com Website: www. adarshengineering.net

बुधवार, दि. १३ मे २०२६
मुंबई, अहमदनगर, पुणे, नाशिक, जळगाव, धुळे, नंदुरबार, सिंधुदुर्ग, रत्नागिरी, पालघर, सांगली, सातारा, कोल्हापूर, सोलापूर, औरंगाबाद, बीड, नांदेड, परभणी, हिंगोली, लातूर, बुलढाणा, अमरावती, अकोला, नागपूर, गडचिरोली, भंडारा, गोंदिया, यवतमाळ, वर्धा, येथून एकाच वेळी प्रकाशित होणारे दैनिक

# इराण युद्धाचा अमेरिकेला मोठा आर्थिक फटका!

## आतापर्यंत 'एवढे' पैसे केले खर्च, ट्रम्प प्रशासनाकडून मोठ्या लष्करी बजेटची मागणी

मुंबई : (स. गांवकरी)



अमेरिका आणि इराण यांच्यात २८ फेब्रुवारी २०२६ रोजी सुरु झालेल्या युद्धाला जवळपास दीड महिन्यांचा कालावधी पूर्ण झाला आहे. इराणला काही दिवसांत गुडघ्यावर आणण्याची भाषा करणाऱ्या अमेरिकेला हे युद्ध चांगलेच भारी पडत असल्याचे चित्र आहे. या युद्धामुळे जागतिक स्तरावर इंधनाच्या किमती वाढल्या आहेत. तर, अमेरिकेत युद्धाच्या खर्चावरून वाद सुरु झाल्याची माहिती समोर आली आहे. अमेरिकेचे संरक्षण सचिव पीट हेगसेथ यांनी मंगळवारी काँग्रेसमधील डेमोक्रॅट आणि रिपब्लिकन खासदारांना उत्तर दिले. राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांच्या २०२७ साठीच्या १.५ ट्रिलियन डॉलर्सच्या लष्करी अर्थसंकल्पाच्या मागणीचे हेगसेथ यांनी समर्थन केले. दोन्ही देशांमध्ये थेट संघर्ष झाल्यानंतर सध्या इराणविरोधात शस्त्रसंधी लागू करण्यात आल्याची माहिती हेगसेथ यांनी खासदारांना दिली. दरम्यान, हाऊस आर्म्ड सर्व्हिसेस कमिटीच्या सुनावणीत इराणविरुद्ध युद्धात किती रुपये खर्च करण्यात आले याची माहिती देण्यात आली होती. हाऊस आर्म्ड सर्व्हिसेस कमिटीची २९ एप्रिल रोजी सुनावणी पार पडली होती. यावेळी अमेरिकेने इराणविरोधातील युद्धावर २५ अब्ज डॉलर्स खर्च केल्याची माहिती देण्यात आली. हा खर्च प्रामुख्याने दारुगोळा आणि उपकरणांच्या देखभालीसाठी वापरण्यात आला होता, असेही यावेळी स्पष्ट करण्यात आले होते. परंतु या युद्धाचा खर्च सुमारे २९ अब्ज डॉलर्सवर पोहोचला असल्याची माहिती पेंटागॉनचे सर्वोच्च अर्थसंकल्पीय अधिकारी ज्युल्स हर्स्ट यांनी काँग्रेसला दिली होती. ४ अब्ज डॉलर्सनी वाढलेला खर्च उपकरणांची दुरुस्ती, पार्ट बदली करणे यासह विविध गोष्टींवर खर्च करण्यात आल्याचे त्यांनी सांगितले.

### अधिक खर्च झाल्याचा दावा

"इराण युद्धावरील खर्चाबाबत ट्रम्प प्रशासनाने दिलेली माहिती चुकीची असू शकते, तसेच खर्चाचा आकडा जास्त असू शकतो", अशी शंका डेमोक्रॅटिक नेते आणि विश्लेषकांनी उपस्थित केली आहे. हार्वर्ड केनेडी स्कूलमधील प्राध्यापिका लिंडा बिल्मेस यांनी मांडलेल्या मतानुसार, "अमेरिकेकडून इराण युद्धावर दररोज सुमारे दोन अब्ज डॉलर्स इतका होत आहे, महत्वाची बाब म्हणजे ही केवळ सुरुवात आहे."

### खर्च वाढण्याची भीती

अल जझीराने दिलेल्या वृत्तानुसार, इराणमधील युद्धामुळे अमेरिकेला ६३० अब्ज ते १ ट्रिलियन डॉलर्सचा खर्च येऊ शकतो असे काही डेमोक्रॅट नेत्यांनी म्हटले आहे. पण, हेगसेथ यांनी यावर बोलताना काँग्रेसमधील डेमोक्रॅट्स आणि काही रिपब्लिकन यांची बेजबाबदार वक्तव्य त्यांचा सर्वात मोठा शत्रू असल्याचे मत मांडले. दुसरीकडे अमेरिका-इस्रायलच्या हल्ल्यांमध्ये किमान ३,३७५ लोक ठार झाले आहेत, अशी माहिती इराणच्या आरोग्य मंत्रालयाने जाहीर केली आहे.

## थोडक्यात...



### अहिल्यानगर महापालिकेचा कर्ज काढण्याचा प्रस्ताव

अहिल्यानगर (स. गांवकरी) : महापालिकेच्या कर्ज काढण्याच्या प्रस्तावास काँग्रेस व शिवसेनेच्या ठाकरे गटाने विरोध दर्शवला आहे. भाजप व राष्ट्रवादी काँग्रेसची गल्ली ते दिल्ली सत्ता असूनही त्यांना महापालिकेसाठी अनुदान आणता येत नाही, म्हणून शहराला कर्जबाजारी करण्याचा उद्योग त्यांनी सुरू केल्याची टीका ठाकरे गटाचे महानगर प्रमुख किरण काळे यांनी केली आहे तर काँग्रेसचे शहर जिल्हाध्यक्ष दीप चव्हाण यांनी पाणीयोजनेसाठी यापूर्वीच २५० कोटी रुपये खर्चूनही नगरकर तहानलेलेच आहेत, त्यामुळे नगरसेवकांनी या प्रस्तावाला मान्यता देऊ नये व महापालिकेने हा प्रस्ताव मागे घ्यावा असे आवाहन केले आहे. शहराच्या विविध भागातील व्यापारी संकुले व शहराची नवी पाणीपुरवठा योजनेसह उपनगरातील भूयारी योजनेसाठी एकूण सुमारे १ हजार कोटींचे कर्ज काढण्याचा प्रस्ताव आयुक्त यशवंत डांगे यांनी तयार केला असून तो १५ मे रोजी होणाऱ्या सभेपुढे सादर केला जाणार आहे. या पार्श्वभूमीवर ठाकरे गट व काँग्रेसने विरोध केला आहे.

### जलविद्युत प्रकल्पाच्या क्षमतेत वाढ होणार

अकोले (स. गांवकरी) : अहिल्यानगर आणि ठाणे जिल्ह्याच्या सीमेवर असणाऱ्या घाटघर उदंचन जलविद्युत प्रकल्पाच्या वीजनिर्मिती क्षमतेत ५० टक्क्यांची वाढ होणार आहे. २५० मेगावॅट क्षमतेच्या या प्रकल्पाच्या दुसऱ्या टप्प्यात आणखी १२५ मेगावॅट वीजनिर्मिती करण्याचे नियोजन आहे. त्यामुळे या प्रकल्पाची वीज निर्मिती क्षमता ३७५ मेगावॅट होणार आहे. घाटघरचा हा जलविद्युत प्रकल्प पंप स्टोरेज स्वरूपाचा आहे. या प्रकल्पात पाण्याचा पुनर्वापर वीज निर्मितीसाठी केला जातो. घाटघर जलविद्युत प्रकल्पात अहिल्यानगर जिल्ह्यातील घाटघर ( ता. अकोले) येथे प्रवरा नदीवर उर्ध्व धरण असून ठाणे जिल्ह्यातील चोंडे (ता. शहापूर) येथे शाई नदीवर निम्न धरण आहे. कोकणकड्याजवळ डोंगराच्या पोटात भुयारांतर्गत विद्युतगृह असून तेथे प्रत्येकी १२५ मेगावॅट क्षमतेच्या दोन जनित्रांद्वारे २५० मेगावॅट वीजनिर्मिती केली जाते.

### सरकारी पैशांत मजा

अकोले (स. गांवकरी) : राज्यातील गोरगरीब आणि अनुसूचित जातींच्या कल्याणासाठी काम करणाऱ्या सामाजिक न्याय विभागाचा अजब कारभार समोर आला आहे. सरकारी नियमांना धाब्यावर बसवत या विभागाच्या 'बार्टी' संस्थेने आपल्या ५० हून अधिक अधिकाऱ्यांसाठी लोणावळ्यातील एका आलिशान खासगी रिसॉर्टमध्ये दोन दिवसांचे 'प्रशिक्षण' आयोजित केले. या दोन दिवसांच्या सुट्टीवजा कार्यशाळेसाठी सरकारी तिजोरीतून तब्बल २० लाख रुपये खर्च केल्याचा प्राथमिक अंदाज असून, यावरून आता मोठा वाद निर्माण झाला आहे. असे वृत्त 'हिंदुस्तान टाइम्स'ने प्रसिद्ध केले आहे. डॉ. बाबासाहेब आंबेडकर संशोधन व प्रशिक्षण संस्था (बार्टी) ही सामाजिक न्याय विभागांतर्गत येणारी एक स्वायत्त संस्था आहे. या संस्थेमार्फत ८ आणि ९ मे रोजी लोणावळ्यातील 'इक्षणा रिसॉर्ट अँड स्पा' येथे एका राज्यस्तरीय कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले होते. धक्कादायक बाब म्हणजे, या रिसॉर्टमध्ये स्पा, बार, गेम झोन आणि जकुझी यांसारख्या आलिशान सुविधा आहेत. एका खोलीचे एका रात्रीचे भाडे साधारण ९,६०० रुपये आहे.

## खरीप हंगामावरील खत टंचाईचे सावट गडद, आवाहनाला प्रतिसाद

मुंबई : (स. गांवकरी)



नैसर्गिक वायूच्या टंचाईमुळे गतवर्षाच्या तुलनेत यंदा देशाच्या युरिया उत्पादनात ४.३ टक्क्यांनी घट झाली आहे. फक्त मार्च महिन्याचा विचार करता युरिया उत्पादनात २९.१ टक्क्यांनी घट झाली आहे. म्युरेट ऑफ पोटॅशची (एमओपी) शंभर टक्के आयात केली जाते. एमओपीच्या आयातीत १७.३ टक्क्यांनी घट झाली आहे. अन्य खतांचे उत्पादन आणि आयातीची स्थिती यापेक्षा वेगळी नसल्यामुळे आगामी खरीप हंगामावरील खत टंचाईचे सावट आणखी गडद झाले आहे. द फर्टिलायझर असोसिएशन ऑफ इंडियाने (एफएआय) दिलेल्या माहितीनुसार युरिया निर्मितीसाठी आवश्यक असलेल्या नैसर्गिक वायूची टंचाई आणि प्रामुख्याने युरिया उत्पादक आखाती देशांमधील उत्पादन विस्कळीत झाल्यामुळे युरियाच्या उत्पादन आणि आयातीत घट झाली आहे. गतवर्षी (एप्रिल ते मार्च) ३ कोटी ६ लाख ४० हजार टन युरिया उत्पादन झाले होते, चालू वर्षी २ कोटी ९३ लाख १६ हजार टन उत्पादन झाले आहे. फक्त मार्च महिन्याचा विचार करता गतवर्षी मार्च महिन्यात २४.७० लाख टन युरिया उत्पादन झाले होते, चालू वर्षी १७.५१ लाख टन उत्पादन झाले आहे. गतवर्षीच्या तुलनेत ४.३ टक्क्यांनी तर मार्च महिन्याचा विचार करता २९.१ टक्क्यांनी उत्पादनात घट झाली आहे. म्युरेट ऑफ पोटॅश (एमओपी) देशात उत्पादीत होत नाही, एमओपीची शंभर टक्के आयात होते. गतवर्षी एमओपीची आयात ३५.४१ लाख टन आयात झाली होती, यंदा २९.२९ लाख टन आयात झाली आहे. गतवर्षीच्या तुलनेत एमओपीची आयात १७.३ टक्क्यांनी घटली आहे.

## यंदा मोसमी पाऊस लवकर दाखल होणार

मुंबई : (स. गांवकरी)



राज्यात सध्या उन्हाळा तीव्र होत असून काही ठिकणी उष्णतेची लाटेसदृश्य स्थिती आहे. यामुळे राज्यातील नागरिकांना उर्वरित मे महिन्याच्या चिंतेसोबतच यंदाचा पावसाळा कसा असेल याची काळजी लागली आहे. दरम्यान, मोसमी पाऊस वेळेवर दाखल होण्यासाठी सध्या दक्षिण बंगालच्या उपसागरात तसेच अंदमान समुद्र आणि अंदमान आणि निकोबार बेट येथे अनुकूल स्थिती निर्माण झाली असून मोसमी पाऊस या आठवड्याच्या अखेरीस या प्रदेशात दाखल होण्याची शक्यता भारतीय हवामानशास्त्र विभागाने मंगळवारी वर्तविली आहे. या अंदाजानुसार पाऊस लवकर दाखल झाल्यास अंदमान येथे मोमसी पावसाचे आगमन नेहमीपेक्षा पाच ते सहा दिवस आधी होईल. गेल्यावर्षीचा अपवाद वगळता अंदमान येथे साधारणपणे २२ मेपर्यंत मोसमी पावसाचे आगमन होत असते. गेल्यावर्षी मात्र १३ मे रोजी पाऊस दाखल झाला होता. अंदमानात मोसमी पाऊस स्थिरावल्यानंतर हळूहळू भारताच्या दिशेने सरकतो. केरळमध्ये पावसाचे आगमन साधारण १ जून रोजी होते. त्यानंतर साधारणपणे १० ते १२ दिवसात मोसमी पाऊस महाराष्ट्रात दाखल होतो, असे आजवरचे हवामानाचे दाखले आहेत. यंदा देशभरात पाऊस कमी होण्याचा अंदाज वर्तवण्यात आला असला तरी पाऊस वेळेवर दाखल होणार आहे. सध्या त्यासाठी अनुकूल स्थिती निर्माण झाली आहे. या आठवड्याअखेरीस अंदमानात मोसमी पाऊस धडकल्यास आणि त्याचा पुढील प्रवासात काही अडथळा उभा न राहिल्यास राज्यात १५ ते २० जून दरम्यान पाऊस दाखल होऊ शकतो. यंदाच्या पावसावर 'एल निनो' चे सावट असेल अशी शक्यता भारतीय हवामान विभागाने याआधीच आपल्या पहिल्या टप्प्यातील दीर्घकालीन अंदाजात व्यक्त केली होती. या अंदाजनुसार, या वर्षीच्या हंगामात सरासरीच्या ९२ टक्के पावसाचा अंदाजही हवामान विभागाने वर्तविला होता. दरम्यान, मे महिन्याच्या शेवटच्या आठवड्यात भारतीय हवामानशास्त्र विभागाकडून मोसमी पावसाचे सुधारित अंदाज जाहीर केले जातात. त्यांनतरच मोसमी पावसाचे चित्र अधिक स्पष्ट होणार आहे.

बंगालच्या उपसागरात कमी दाबाचे क्षेत्रबंगालच्या उपसागराच्या नैऋत्य भागात कमी दाबाचे क्षेत्र तयार झाल्याची माहिती सोमवारी हवामान विभागाकडून देण्यात आली आहे. हवामान विभागाने दिलेल्या माहितीनुसार, ही प्रणाली सध्या याच प्रदेशात सक्रिय असून पुढील काही काळात ही प्रणाली अधिक तीव्र होण्याचा अंदाज आहे. तसेच या प्रणालीमुळे बंगालच्या उपसागराच्या नैऋत्य प्रदेशात चक्रीवादळासारखी वाऱ्यांची गोलाकार स्थिती कायम आहे.

# ऊर्जा, महागाई आणि अर्थकारणाचे मोठे संकट!

## "इंधन बचत, वर्क फ्रॉम होम आणि ऊर्जा संयम आता काळाची गरज" – डॉ. विश्वासराव आरोटे

## जागतिक युद्धसदृश परिस्थितीचा भारतावर परिणाम; पेट्रोल-डिझेल दरवाढ अटळ असल्याचे संकेत!

### पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या आव्हानावर डॉ. विश्वासराव आरोटे यांचे सखोल विश्लेषण

(स. गांवकरी)




पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी बंगळुरू आणि हैदराबाद येथील कार्यक्रमांमध्ये केलेल्या वक्तव्यांनंतर देशभरात आर्थिक आणि राजकीय चर्चांना वेग आला असून, या पार्श्वभूमीवर महाराष्ट्र राज्य पत्रकार संघाचे राज्य सरचिटणीस डॉ.विश्वासराव आरोटे यांनी सविस्तर विश्लेषण करत भारतासमोर उभ्या ठाकलेल्या ऊर्जा आणि आर्थिक संकटाकडे लक्ष वेधले आहे.

डॉ. आरोटे यांनी स्पष्ट शब्दांत सांगितले की, सध्या जागतिक स्तरावर सुरू असलेल्या युद्धजन्य परिस्थितीमुळे आणि पुरवठा साखळी विस्कळीत झाल्यामुळे भारतासारख्या विकसनशील अर्थव्यवस्थेवर प्रचंड दबाव निर्माण झाला आहे. भारत जवळपास ८० ते ८५ टक्के क्रूड ऑइल आयात करतो आणि त्यामुळे जागतिक बाजारातील कोणतीही हालचाल थेट भारतीय अर्थव्यवस्थेवर परिणाम करते.

त्यांच्या मते, भारतीय तेल कंपन्यांना जवळपास ३० ते ३५ हजार कोटी रुपयांचा फटका बसला असून, यामुळे पेट्रोल आणि डिझेल दरवाढ आता अटळ बनली आहे. पाच राज्यांच्या विधानसभा निवडणुका संपल्यानंतर सरकार इंधन दरवाढीचा निर्णय घेऊ शकते, असे संकेतही त्यांनी दिले. डॉ. आरोटे म्हणाले की, पंतप्रधानांनी "इंधनाचा संयमाने वापर करा", "कारपुलिंग वाढवा", "मेट्रोचा वापर करा" आणि "वर्क फ्रॉम होमचा विचार करा" असे केलेले आवाहन केवळ राजकीय विधान नाही, तर त्यामागे गंभीर आर्थिक वास्तव दडलेले आहे.

कोविड काळात जशा पुरवठा साखळी कोलमडल्या होत्या, त्याच प्रकारचे संकट पुन्हा निर्माण होण्याची शक्यता आहे. जागतिक बाजारपेठेत कच्च्या तेलाच्या किमती वाढत आहेत, तर रशियासारख्या मित्र राष्ट्रानेही भारताला सवलतीऐवजी अतिरिक्त प्रीमियम आकारण्यास सुरुवात केली आहे. त्यामुळे भारतासाठी परिस्थिती आणखी कठीण बनत चालली आहे.

डॉ. आरोटे यांनी चीनच्या ऊर्जा धोरणाचा विशेष उल्लेख करत सांगितले की, चीनने खूप आधीपासून इलेक्ट्रिक वाहनांचा आणि पर्यायी ऊर्जास्रोतांचा स्वीकार केला आहे. त्यामुळे आजच्या संकटात चीन तुलनेने अधिक सक्षम स्थितीत आहे.

ते म्हणाले की, अमेरिका आणि रशिया हे स्वतःच्या तेलसाठ्यामुळे मोठ्या प्रमाणावर स्वयंपूर्ण आहेत, तर मध्यपूर्व देश तेलसंपन्न आहेत. मात्र भारत आणि युरोपियन राष्ट्रांसमोर मोठे संकट उभे राहिले आहे. भारताने ऊर्जेच्या पर्यायी स्रोतांवर आणि इलेक्ट्रिक मोबिलिटीवर अधिक वेगाने काम करणे गरजेचे आहे.

डॉ. आरोटे यांनी सांगितले की, या जागतिक संकटाचा परिणाम केवळ पेट्रोल-डिझेलपुरता मर्यादित राहणार नाही. उत्पादन क्षेत्र, बांधकाम उद्योग, वाहतूक व्यवस्था आणि लघुउद्योगांवर त्याचा मोठा परिणाम होत आहे.

जागतिक ऑर्डर्स कमी झाल्याने एन्किलरी उद्योगांची कामे ठप्प झाली आहेत. अनेक ठिकाणी गॅस आणि इंधन टंचाईमुळे कामगार मूळ गावी परत गेले आहेत. परिणामी बांधकाम क्षेत्रासह अनेक उद्योग संकटात आले आहेत. वेळेवर पेमेंट होत नसल्याने उद्योग साखळीवर मोठा दबाव निर्माण झाला आहे.

त्यांनी इशारा दिला की, हे संकट आणखी गडद झाल्यास देशात मोठ्या प्रमाणावर महागाई वाढू शकते आणि त्याचे सामाजिक व राजकीय परिणामही दिसू शकतात.

पंतप्रधानांनी कोविड काळातील "वर्क फ्रॉम होम" मॉडेलचा उल्लेख केल्याबाबत बोलताना डॉ. आरोटे म्हणाले की, आगामी काळात अनेक कॉर्पोरेट कंपन्या पुन्हा घरून काम करण्याच्या पद्धतीचा अवलंब करू शकतात. ऊर्जा बचत, कार्यालयीन वाहतूक कमी करणे आणि इंधन वापरावर नियंत्रण ठेवणे यासाठी सरकार विविध उपाययोजना करू शकते. रात्रीच्या वेळेतील वीज वापरावर निर्बंध, अतिरिक्त वापरावर जादा शुल्क आणि ऊर्जा बचतीसाठी विशेष धोरणे लागू होण्याची शक्यता त्यांनी व्यक्त केली. डॉ. आरोटे यांनी भारतीय अर्थव्यवस्थेला बसलेल्या धक्क्यांचा उल्लेख करताना नोटाबंदी, कोविड महामारी आणि जागतिक व्यापार संघर्ष या तीन मोठ्या संकटांचा संदर्भ दिला.

त्यांच्या मते, कोविडमुळे अर्थव्यवस्थेला मोठा धक्का बसल्यानंतर जागतिक व्यापार तणाव आणि पुरवठा साखळीतील अडथळ्यांमुळे भारतासमोर नवीन संकट उभे राहिले आहे. विकसनशील अर्थव्यवस्था म्हणून भारताला याचा सर्वाधिक फटका बसत आहे.

### "राष्ट्रहित सर्वोच्च ठेवून एकजूट आवश्यक"

पंतप्रधान मोदी यांनी केलेल्या "देश आणि भारत मातेला सर्वोच्च स्थानी ठेवून एकजूट होण्याच्या" आवाहनाला पाठिंबा देताना डॉ. आरोटे म्हणाले की, आता ऊर्जा बचत आणि आर्थिक शिस्त ही केवळ सरकारी जबाबदारी राहिलेली नाही, तर प्रत्येक नागरिकाची जबाबदारी बनली आहे. त्यांनी स्पष्ट केले की, कोणतेही सरकार सत्तेत असते तरी या परिस्थितीत कठोर निर्णय घ्यावेच लागले असते. त्यामुळे राजकारण बाजूला ठेवून देशहिताच्या दृष्टीने नागरिकांनी परिस्थिती समजून घेणे गरजेचे आहे.

### "भारतात मोठ्या आर्थिक बदलांची चाहूल"

लेखाच्या शेवटी डॉ. विश्वासराव आरोटे यांनी इशारा दिला की, येत्या काही महिन्यांत भारतात पेट्रोल-डिझेल दरवाढ, महागाई, ऊर्जा बचत मोहीम, वर्क फ्रॉम होम आणि कठोर आर्थिक उपाययोजना यांची शक्यता अधिक वाढली आहे. त्यांनी सांगितले की, "गरज असेल तरच इंधन वापरा" हा पंतप्रधानांचा संदेश भविष्यातील गंभीर परिस्थितीची पूर्वसूचना मानली पाहिजे. भारताला ऊर्जा स्वावलंबनाकडे वेगाने वाटचाल करावी लागेल, अन्यथा आर्थिक संकट अधिक तीव्र होऊ शकते.



# राज्य संघटक संजय भोकरे यांना झेड प्लस सुरक्षा द्या

## हत्याकटातील मुख्य सूत्रधाराला तात्काळ अटक करा – प्रदेशाध्यक्ष निलेश सोमानी!

### मंत्रालयात विविध मंत्र्यांची भेट घेऊन निवेदन; पत्रकारांच्या सुरक्षेचा प्रश्न ऐरणीवर!

**मुंबई : (स. गांवकरी)**

संजय भोकरे यांच्या हत्येचा कट रचण्यात आल्याच्या धक्कादायक प्रकरणानंतर आता महाराष्ट्र राज्य पत्रकार संघ आक्रमक झाला असून या कटामागील मुख्य सूत्रधाराला तात्काळ अटक करण्यात यावी तसेच भोकरे यांना झेड प्लस सुरक्षा देण्यात यावी, अशी जोरदार मागणी संघटनेचे प्रदेशाध्यक्ष निलेश सोमानी यांनी राज्य शासनाकडे केली आहे. या मागणीसाठी सोमानी यांनी मंत्रालयात जाऊन विविध मंत्र्यांची भेट घेत निवेदन सादर केले व पत्रकारांच्या सुरक्षेचा गंभीर मुद्दा शासनासमोर मांडला.

सोमानी यांनी राज्याचे उच्च व तंत्र शिक्षण मंत्री तथा सांगली जिल्ह्याचे पालकमंत्री चंद्रकांत पाटील, वैद्यकीय शिक्षण मंत्री हसन मुश्रीफ, कानून व न्याय राज्यमंत्री आशिष जयस्वाल, कृषी मंत्री दत्तात्रय भरणे तसेच राज्यसभा सदस्य रामराव वडकुते यांची मंत्रालयातील दालनात भेट घेतली. यावेळी त्यांनी निवेदन देत या संपूर्ण प्रकरणाची सविस्तर माहिती संबंधित मंत्र्यांना दिली.

निवेदनात नमूद करण्यात आले आहे की, महाराष्ट्र राज्य पत्रकार संघाचे संस्थापक संघटक तथा संपादक संजय भोकरे यांच्या जीवावर बेतणारा गंभीर कट काही दिवसांपूर्वी उघडकीस आला. संस्थेच्या जमीन वादातून हा कट रचण्यात आल्याची माहिती समोर आली असून पोलिसांच्या सतर्कतेमुळे मोठी दुर्घटना टळली. मात्र आरोपींनी आखलेला पहिला डाव फसला असला तरी त्यांच्या पुढील हालचालींकडे दुर्लक्ष करून चालणार नाही. संबंधित आरोपींकडून पुन्हा हल्ल्याचा प्रयत्न होण्याची शक्यता नाकारता येत नसल्याने शासनाने या प्रकरणात विशेष लक्ष घालून भोकरे यांना तातडीने झेड प्लस सुरक्षा द्यावी, अशी मागणी करण्यात आली आहे.

यावेळी बोलताना निलेश सोमानी म्हणाले की, "पत्रकार हा लोकशाहीचा चौथा आधारस्तंभ आहे. समाजातील अन्याय, भ्रष्टाचार आणि गुन्हेगारी उघड करणाऱ्या पत्रकारांवरच जीवघेणे हल्ले होऊ लागले तर लोकशाहीसाठी ही अत्यंत धोकादायक बाब आहे. संजय भोकरे यांच्यासारख्या निर्भीड पत्रकाराच्या जीवावर उठणाऱ्यांना कोणतीही दया दाखवू नये. या कटामागील मुख्य सूत्रधाराचा शोध घेऊन त्याच्यावर कठोर कारवाई करणे अत्यावश्यक आहे."

सोमानी यांनी पुढे सांगितले की, पत्रकारांवर वाढणारे हल्ले थांबवण्यासाठी शासनाने विशेष धोरण आखण्याची गरज आहे. पत्रकारांना धमक्या, दबाव व खोट्या गुन्ह्यांमध्ये अडकवण्याचे प्रकार वाढत असून यामुळे पत्रकारितेच्या स्वातंत्र्यावर गदा येत आहे. राज्यातील पत्रकारांना सुरक्षित वातावरण मिळाले पाहिजे, अशी अपेक्षा त्यांनी व्यक्त केली.

या निवेदनाची दखल घेत संबंधित मंत्र्यांनी सकारात्मक प्रतिसाद दिला असून पत्रकारांच्या सुरक्षेबाबत शासन गंभीर असल्याची ग्वाही दिल्याचे सोमानी यांनी सांगितले. या प्रकरणात योग्य ती चौकशी करून संबंधितांवर कठोर कारवाई करण्यात येईल, असे आश्वासनही मंत्र्यांकडून देण्यात आले. निवेदन सादर करताना गणेश देगावकर हे देखील उपस्थित होते. पत्रकार संघाच्या या आक्रमक भूमिकेमुळे आता या प्रकरणाकडे राज्यभरातील पत्रकारांचे लक्ष लागले असून शासन पुढे कोणती भूमिका घेते याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे.











# पिंपळगाव जोगा धरणाचा कालवा फुटला

**ओतूर : (स. गांवकरी)**

जुन्नर तालुक्यातील पिंपळगाव जोगा येथील धरणाचा कालवा पिंपळगाव जोगा गावच्या हद्दीतच रात्री फुटला असून लाखो लिटर पाणी तर वाया गेलेच आहे. मात्र या कालवा फुटीच्या पाण्याने अंदाजे २५ एकर शेतीचे नुकसान होऊन शेतकऱ्यांचे ही मोठे आर्थिक नुकसान झाले आहे. मंगळवारी पहाटे तीन वाजे दरम्यान पिंपळगाव जोगा धरणाचा कालव्याला भगडाड पडून फुटला. ज्या भागात कालवा फुटला आहे. तेथील पुढे शेत असलेले सुनिल निमसे, संतोष निमसे, पंकज हांडे, शेखर हांडे, शंकर हांडे त्यांचे इतर भाऊ, विश्वास हांडे व त्यांचे इतर भाऊ असे पंचवीस एकर मधील शेती पिकांचे नुकसान झाले असून त्यातील निमसे व इतर शेतकऱ्यांच्या शेतातील पाच एकर शेता मधील पुर्ण माती वाहून गेली आहे. तसेच शेतकऱ्याची काढायला आलेली पिके पाण्याच्या लोढ्याने पुर्ण भुईसपाट झाली आहे. तसेच बाजूच्या शेतकऱ्यांच्या जमिनीचे व पिकांचे



मोठे नुकसान झाले आहे. पिंपळगाव जोगा धरणावर शेतकऱ्यांनी स्वतः जाऊन कालव्याचे पाणी बंद केले. सदर कालवा मोठ्या प्रमाणात फुटला असल्याने कालव्याची दुरुस्ती काळ कालव्याच्या पाण्यावर अवलंबून असल्याल्या नागरीकांसाठी अडचणीचा ठरणार असून त्यांना ऐन उन्हाळ्यात पाणी टंचाईला सामोरे जावे लागणार आहे. पिंपळगाव जोगा कालवा फुटल्याने परीसरातील शेतकऱ्यांचे मोठे आर्थिक नुकसान झाले असून पाटबंधारे विभागाने त्वरित नुकसान भरपाई जाहीर करावी अशी मागणी नवनाथ सुकाळे व पंकज हांडे यांनी केली आहे.

# गुणवंत विद्यार्थ्यांचा मान्यवरांच्या हस्ते भव्य सत्कार!





**अकोले : (स. गांवकरी)**

अकोले तालुक्यातील प्रवरा परिसरातील चितळवेढे गावातील इयत्ता दहावी परीक्षेत घवघवीत यश संपादन करून गावाचे नाव उज्ज्वल करणाऱ्या गुणवंत विद्यार्थ्यांचा महाराष्ट्र राज्य पत्रकार संघ व दैनिक समर्थ गांवकरी समूहाच्या वतीने विशेष सत्कार सोहळा उत्साहात संपन्न झाला. विद्यार्थ्यांच्या यशाचा गौरव करण्यासाठी आयोजित करण्यात आलेल्या या कार्यक्रमाला ग्रामस्थ, पालक व मान्यवर उपस्थित होते. यावेळी वैष्णवी आरोटे, आदिती आरोटे, छत्रपती आरोटे आणि आर्यन आरोटे या विद्यार्थ्यांनी दहावी परीक्षेत उल्लेखनीय यश संपादन केल्याबद्दल त्यांचा शाल, पुष्पगुच्छ, श्रीफळ तसेच शालेय साहित्य देऊन सन्मान करण्यात आला. विद्यार्थ्यांच्या यशामुळे परिसरात आनंदाचे वातावरण निर्माण झाले असून सर्व स्तरातून त्यांच्यावर अभिनंदनाचा वर्षाव होत आहे. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी महाराष्ट्र राज्य आरपीआयचे प्रदेश उपाध्यक्ष डॉ. स्वामी वेंकप्पा वैदु हे उपस्थित होते. तसेच महाराष्ट्र राज्य पत्रकार संघाचे राज्य सरचिटणीस तथा दैनिक समर्थ गांवकरीचे संपादक डॉ. विश्वासराव आरोटे यांनी विद्यार्थ्यांचे विशेष कौतुक करताना सातत्यपूर्ण अभ्यास, जिद्द आणि पालकांचे मार्गदर्शन यामुळेच यश प्राप्त होते, असे प्रतिपादन केले. यावेळी प्रगतशील शेतकरी किसन आरोटे, राहुल फुंद, सुदामराव वाकचौरे, निखिल भांगरे आदी मान्यवर उपस्थित होते.

उपस्थित मान्यवरांनी विद्यार्थ्यांना पुढील शैक्षणिक वाटचालीसाठी शुभेच्छा देत उच्च शिक्षण घेऊन समाजासाठी आदर्श निर्माण करण्याचे आवाहन केले.

गुणवंत विद्यार्थ्यांच्या सन्मानामुळे चितळवेढे गावात उत्साहाचे वातावरण निर्माण झाले असून, भविष्यातही अशाच प्रकारे विद्यार्थ्यांना प्रोत्साहन देण्यासाठी सामाजिक स्तरावर उपक्रम राबविण्यात येणार असल्याचे यावेळी सांगण्यात आले.

# महाराष्ट्र राज्य नर्सिंग युनियनच्या निवडणूकीत श्रीदेवी मस्के विजयी



**नांदेड जिल्हा : (स. गांवकरी)**

नांदेड येथील डॉ. शंकरराव चव्हाण शासकीय रुग्णालय,विष्णूपूरी नांदेड येथील महाराष्ट्र राज्य नर्सिंग युनियनच्या अधक्ष पदासाठीच्या झालेल्या अटीतटीच्या निवडणूकीत युनियन कर्मचारी सौ.श्रीदेवी प्रदिप शेंडगे (मस्के) ह्या भरघोष मतांनी विजयी झाल्या आहेत. नर्सिंग युनियनच्या कर्मचारी बांधवांनी त्यांच्या कार्य-कृतत्वावर व काम करण्याच्या कार्यशैलीवर विश्वास ठेवत आपले अमूल्य मतदान श्रीदेवी यांच्या पारड्यात टाकून प्रचंड मताधिक्याने विजय घडवून आणला.त्यामुळे नर्सिंग कर्मचारी वर्गात आनंदाचे वातावरण पसरले असून त्यांचे अधिकारी,पदाधिकारी, मान्यवर मंडळीकडून व नातेवाईकांतुन त्यांच्यावर अभिनंदनाचा वर्षाव केला जात आहे. या निवडणुकीत मला भरघोष मतांनी विजयी केल्याबद्दल सर्व कर्मचारी मतदारांचे मनःपूर्वक आभार नवनिर्वाचित अध्यक्षा श्रीदेवी मस्के (शेंडगे ) यांनी मानले आहेत .

# मान्सून पूर्व आढावा बैठक संपन्न



**नांदेड जिल्हा : (स. गांवकरी)**

आगामी पावसाळ्याच्या पार्श्वभूमीवर संभाव्य नैसर्गिक आपत्तींचा सामना प्रभावीपणे करण्यासाठी तसेच जीवित व वित्तहानी टाळण्याच्या दृष्टीने नांदेड तालुकास्तरीय मान्सून पूर्व आढावा बैठक आज नियोजन भवन, जिल्हाधिकारी कार्यालय, नांदेड येथे पार पडली. सदर बैठकीच्या अध्यक्षस्थानी उपविभागीय अधिकारी डॉ. सचिन खल्लाळ हे होते. बैठकीस तहसीलदार संजय वारकड, सार्वजनिक बांधकाम विभाग, पाटबंधारे विभाग (इरिगेशन), महावितरण (एमएसईबी), कृषी विभाग, ग्रामविकास विभाग, ग्रामसेवक, कृषी सहाय्यक, तलाठी, मंडळ अधिकारी, पोलीस प्रशासन, नांदेड-वाघाळा शहर महानगरपालिका तसेच नैसर्गिक आपत्ती व्यवस्थापनाशी संबंधित विविध तालुकास्तरीय विभागांचे अधिकारी व कर्मचारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

सदर बैठकीमध्ये आगामी मान्सून दरम्यान उद्भवू शकणाऱ्या अतिवृष्टी, पूर परिस्थिती, नदी-नाल्यांना येणारे पाणी, शहर व ग्रामीण भागातील साचणारे पाणी, वीजपुरवठा खंडित होणे, धोकादायक व जीर्ण इमारती, रस्ते व पुलांची स्थिती, नाल्यांचे खोलीकरण व स्वच्छता, झाडे पडण्याच्या घटना, शेती पिकांचे नुकसान, नागरिकांचे सुरक्षित स्थलांतर तसेच आपत्कालीन परिस्थितीत तात्काळ मदत व बचाव कार्य याबाबत सविस्तर चर्चा करण्यात आली.

उपविभागीय अधिकारी डॉ. सचिन खल्लाळ यांनी सर्व विभागांनी समन्वयाने कार्य करून आपत्तीपूर्व तयारी पूर्ण करावी, अशा सूचना दिल्या. विशेषतः शहर व ग्रामीण भागातील संवेदनशील ठिकाणांची यादी तयार करून तेथे आवश्यक उपाययोजना तात्काळ राबवाव्यात, असे निर्देश त्यांनी दिले.

तसेच पूरप्रवण भाग, नदीकाठची गावे, नाल्यालगतची वस्ती, धोकादायक इमारती तसेच पाणी साचणारे भाग यावर विशेष लक्ष केंद्रित करण्याचे आदेश देण्यात आले. तहसीलदार संजय वारकड यांनी महसूल विभाग, तलाठी, मंडळ अधिकारी तसेच ग्रामस्तरावरील यंत्रणांनी सतर्क राहून आपत्कालीन परिस्थितीत त्वरित प्रतिसाद देण्याचे निर्देश दिले. तसेच प्रत्येक विभागाने आपापल्या नियंत्रण कक्षांची माहिती अद्ययावत ठेवून आवश्यक मनुष्यबळ व साहित्य सज्ज ठेवावे, असे सांगितले. नांदेड-वाघाळा शहर महानगरपालिकेस शहरातील नाले, गटारी व पावसाच्या पाण्याचा निचरा होणाऱ्या मार्गांची तात्काळ स्वच्छता व दुरुस्ती करण्याच्या सूचना देण्यात आल्या. सार्वजनिक बांधकाम विभागास धोकादायक रस्ते व पुलांची पाहणी करून आवश्यक दुरुस्ती करावी, तर महावितरण विभागास वीजवाहिन्या व विद्युत खांबांची तपासणी करून आपत्कालीन यंत्रणा सज्ज ठेवण्याचे निर्देश देण्यात आले.

यावेळी कृषी विभागास शेतकऱ्यांना हवामानाबाबत मार्गदर्शन करणे, संभाव्य पिकनुकसान टाळण्यासाठी उपाययोजना सुचविणे तसेच ग्रामपातळीवरील कर्मचाऱ्यांनी आपत्तीच्या प्रसंगी नागरिकांना तात्काळ माहिती देण्याच्या सूचनाही देण्यात आल्या. पोलीस प्रशासनास वाहतूक नियंत्रण, बचाव कार्य व आपत्कालीन परिस्थितीत समन्वय राखण्याबाबत निर्देशित करण्यात आले. बैठकीदरम्यान विविध विभागांकडून करण्यात आलेल्या मान्सूनपूर्व तयारीचा सविस्तर आढावा घेण्यात आला. तसेच सर्व संबंधित यंत्रणांनी आपापसातील समन्वय अधिक मजबूत ठेवून नागरिकांच्या सुरक्षिततेस सर्वोच्च प्राधान्य द्यावे, असे आवाहन प्रशासनाकडून करण्यात आले. सदर बैठकीमुळे आगामी पावसाळ्यात संभाव्य नैसर्गिक आपत्तींचा प्रभाव कमी करण्यासाठी प्रशासन अधिक उपाययोजनांवर भर देत आहे.

# पुन्हा निवडणुकीचा धुरळा

**अहिल्यानगर : (स. गांवकरी)**



राज्यात पुन्हा एखादा निवडणुकीचा धुरळा उडण्याची शक्यता आहे. स्थानिक स्वराज्य संस्थाच्या निवडणुका झाल्यानंतर आता विधानपरिषदेच्या रिक्त जागांच्या निवडणुकीचा मार्ग मोकळा झाला आहे. यामुळे पावसाळी अधिवेशनाआधी विधान परिषदेच्या सदस्यसंख्येत आणखी भर पडणार आहे. स्थानिक स्वराज्य संस्थांच्या विधान परिषदेच्या १७ जागांसंदर्भात पुढील आठवड्यात निवडणूक जाहीर होण्याची शक्यता आहे. राज्यात स्थानिक स्वराज्य संस्थाच्या निवडणुका पार पडल्या नव्हत्या. त्यामुळे स्थानिक स्वराज्य संस्थांशी संबंधित मतदारसंघातन निवडून आलेल्या सदस्यांचा कार्यकाळ संपल्यानंतर निवडणुकांची घोषणा झालेली नव्हती. मागील अडीच वर्षांपासून या जागा रिक्त होत्या. काही महिन्यापूर्वी स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका संपन्न झाल्या. त्यामुळे स्थानिक स्वराज्य संस्था मतदारसंघात किमान ७५ टक्के मतदार उपलब्ध असणार आहेत. ही अट पूर्ण झाल्याने निवडणुकीची प्रकियेस सुरुवात होण्याची शक्यता आहे. त्यामुळे स्थानिक स्वराज्य संस्थेशी संबंधित १७ जागांसंदर्भात पुढील आठवड्यात निवडणूक जाहीर होण्याची शक्यता आहे.

# संजय भोकरे यांच्या जीविताला धोका

## पत्रकार संघाने मागितले Z+ दर्जाचे सुरक्षा

**अहिल्यानगर : (स. गांवकरी)**

महाराष्ट्र राज्य पत्रकार संघाचे राज्य संघटक संजय भोकरे यांच्या हत्येचा कट रचणाऱ्या मुख्य आरोपीला अटक होईपर्यंत त्यांना तातडीने Z+ दर्जाचे पोलीस संरक्षण द्यावे, अशी आग्रही मागणी महाराष्ट्र राज्य पत्रकार संघ डिजिटल मीडियाने केली आहे. या प्रकरणी महाराष्ट्र राज्य पत्रकार संघ मुंबई डिजिटल मीडिया जिल्हाध्यक्ष विनोद गायकवाड व पारनेर तालुका उपाध्यक्ष श्रीनिवास शिंदे यांनी निवासी उपजिल्हाधिकारी दादासाहेब गीते व अपर पोलीस अधीक्षक वैभव कालुबरमे यांना निवेदन दिले. सांगली पोलिसांनी अलीकडेच भोकरे यांच्या हत्येचा कट उधळला आहे. वादग्रस्त जमिनीच्या ताब्यासाठी सुपारी देऊन हत्या घडवण्याचा डाव आखला गेल्याची धक्कादायक माहिती तपासात समोर आली. या प्रकरणात तीन आरोपींना अटक करण्यात आली असून, त्यांच्याकडून दोन देशी बनावटीची पिस्तुले, आठ जिवंत काडतुसे आणि धारदार चाकू जप्त करण्यात आले आहेत. या घटनेमुळे सांगली-मिरज परिसरात खळबळ उडाली आहे.

निवेदन देताना डिजिटल मीडिया जिल्हाध्यक्ष विनोद गायकवाड म्हणाले, "संजयजी भोकरे यांच्या जिवाला गंभीर धोका आहे. मुख्य सूत्रधार अद्याप फरारी आहे. तोपर्यंत त्यांना उच्चस्तरीय सुरक्षा देणे आवश्यक आहे. गुन्हेगारांचे धाडस पाहता, प्लॅन बी नुसार पुन्हा हल्ला होण्याची शक्यता नाकारता येत नाही."

फेब्रुवारी महिन्यापासून आरोपी भोकरे यांची रेकी करत होते. विशेष म्हणजे, साधारण वर्षभरापूर्वी संजय भोकरे यांच्या मुलगा सिद्धार्थ संजय भोकरे यांना पुण्यातून जीवे मारण्याची धमकी मिळाली होती.




> "पत्रकारांच्या सुरक्षेचा प्रश्न हा केवळ वैयक्तिक नाही, तर लोकशाहीचा प्रश्न आहे. संजय भोकरे यांच्यावर होणारा हल्ला हा संपूर्ण पत्रकार वर्गावर होणारा हल्ला समजला पाहिजे. शासनाने त्वरित Z+ सुरक्षा देऊन भोकरे कुटुंबीयांना दिलासा द्यावा."
>
> — विनोद गायकवाड, जिल्हाध्यक्ष, महाराष्ट्र राज्य पत्रकार संघ डिजिटल मीडिया

### महाराष्ट्र राज्य पत्रकार संघाने केलेल्या प्रमुख मागण्या खालीलप्रमाणे

१. संजय भोकरे यांना तातडीने Z+ दर्जाचे पोलीस संरक्षण देण्यात यावे.
२. सिद्धार्थ भोकरे यांना मिळालेल्या धमकी व सध्याच्या हत्याकटाचा संबंध तपासण्यासाठी सखोल चौकशी व्हावी.
३. सूत्रधार व मूळ 'बोलवता धनी' कोण आहे, याचा शोध घेऊन त्यांच्यावर कडक कारवाई करण्यात यावी.

# दोषींना कठोर शिक्षा द्या, मास्टरमाइंडचा शोध घेण्यासाठी विशेष तपास पथक नेमा

- महाराष्ट्र राज्य पत्रकार संघाची मागणी!
- डॉ. विश्वासराव आरोटे आक्रमक; "पत्रकारांवर हल्ले सहन केले जाणार नाहीत"
- संजय भोकरे यांच्या हत्येचा कट उघड; पत्रकारांमध्ये संतापाची लाट!
- दोन एकर संस्थेच्या जागेसाठी रचला जीवघेणा कट? तीन आरोपी अटकेत!
- संजय भोकरे यांना झेड प्लस सुरक्षा द्या; महाराष्ट्र राज्य पत्रकार संघाची मागणी!
- पत्रकार सुरक्षेचा प्रश्न पुन्हा ऐरणीवर; जिल्हानिहाय आंदोलनाचा इशारा!
- भोकरे परिवाराला लक्ष्य करण्यामागे मोठे षड्यंत्र? गृह मंत्रालयाने हस्तक्षेप करावा!
- "आज संजय भोकरे, उद्या कोणताही पत्रकार" – पत्रकार संघाचा इशारा!





**डॉ. विश्वासराव आरोटे**
कळसुबाई शिखरावरून

(स. गांवकरी)

ज्येष्ठ पत्रकार, संपादक, सामाजिक कार्यकर्ते, संजय भोकरे ग्रुप ऑफ इन्स्टिट्यूटचे अध्यक्ष, महाराष्ट्र राज्य पत्रकार संघाचे संघटक तसेच श्री अंबाबाई तालीम संस्थेचे अध्यक्ष मार्गदर्शक संजय भोकरे यांच्या हत्येचा कट उघडकीस आल्यानंतर राज्यभरातील पत्रकारांमध्ये संतापाची तीव्र लाट उसळली आहे. पत्रकारिता, शैक्षणिक आणि सामाजिक क्षेत्रात मोठे योगदान देणाऱ्या भोकरे परिवाराला लक्ष्य करून काही समाजकंटकांनी हा कट रचल्याचा गंभीर आरोप करण्यात येत आहे. या संपूर्ण प्रकरणाची सखोल चौकशी करून कटामागील खरा मास्टरमाइंड शोधून त्याच्यावर कठोर कारवाई करण्यात यावी, अशी मागणी महाराष्ट्र राज्य पत्रकार संघाचे राज्य सरचिटणीस व दैनिक समर्थ गांवकरीचे संपादक डॉ. विश्वासराव आरोटे यांनी केली आहे.

एका खाजगी वृत्तवाहिनीला मुलाखत देताना डॉ. विश्वासराव आरोटे यांनी अत्यंत संतप्त शब्दांत प्रतिक्रिया व्यक्त केली. त्यांनी सांगितले की, संजय भोकरे यांनी आयुष्यभर सर्वसामान्य पत्रकारांसाठी संघर्ष केला. ग्रामीण भागातील पत्रकारांना संघटित करून त्यांना न्याय, सन्मान आणि ओळख मिळवून देण्याचे ऐतिहासिक कार्य त्यांनी केले आहे. महाराष्ट्र, गोवा, दिल्ली, बेळगाव आणि गुजरातसह विविध राज्यांमध्ये पत्रकार संघटनांचे जाळे उभे करून हजारो पत्रकारांना त्यांनी दिशा दिली.

डॉ. आरोटे म्हणाले की, "संजय भोकरे हे केवळ पत्रकार नाहीत, तर ते पत्रकारांच्या हक्कांसाठी लढणारे नेतृत्व आहे. त्यांनी अनेकांना उभे केले, संघटनांना बळ दिले आणि पत्रकारांना न्याय मिळवून देण्यासाठी आयुष्य घालवले. अशा व्यक्तीवर जीवघेणा कट रचला जाणे ही संपूर्ण पत्रकारितेसाठी धोक्याची घंटा आहे." या प्रकरणातील सर्वात धक्कादायक बाब म्हणजे संबंधित दोन एकर जागा ही कोणत्याही व्यक्तीची खासगी मालमत्ता नसून संस्थेची मालमत्ता असल्याचे समोर आले आहे. ही जागा हस्तगत करण्यासाठीच काही मास्टरमाइंड लोकांनी संजय भोकरे यांना जीवे मारण्याची सुपारी दिल्याचा गंभीर आरोप करण्यात येत आहे.

या कटामध्ये सहभागी असलेल्या तिघांना पोलिसांनी अटक केली असून, चौकशीत सुपारी देणाऱ्या व्यक्तीचे नाव समोर आल्याची माहिती आहे. मात्र या संपूर्ण कटामागे आणखी मोठा सूत्रधार असल्याची चर्चा सुरू आहे. पोलिसांनी या दिशेने तपास अधिक वेगाने करावा, अशी मागणी पत्रकार संघटनांकडून केली जात आहे.

डॉ. आरोटे यांनी स्पष्ट शब्दांत सांगितले की, "भोकरे हे या मालमत्तेच्या गैरव्यवहारात अडसर ठरत होते. त्यामुळे त्यांना कायमचे संपवून जागा बळकावण्याचा प्रयत्न झाला. पण पोलिसांच्या सतर्कतेमुळे हा मोठा कट उधळला गेला. अन्यथा राज्याने एक निर्भीड पत्रकार गमावला असता."

डॉ. आरोटे यांनी यावेळी आणखी एक धक्कादायक माहिती दिली. डिजिटल मीडिया विभागाचे प्रदेशाध्यक्ष सिद्धार्थ भोकरे यांनाही काही महिन्यांपूर्वी पुण्यावरून जीवे मारण्याच्या धमक्या आल्या होत्या. त्यामुळे भोकरे परिवाराला नियोजनबद्ध पद्धतीने लक्ष्य केले जात असल्याचा संशय व्यक्त होत आहे.

"पत्रकारिता, सामाजिक कार्य आणि शैक्षणिक क्षेत्रात भोकरे परिवाराने मोठे कार्य उभे केले आहे. अनेक वर्षांच्या संघर्षातून त्यांनी संस्था उभ्या केल्या. त्यामुळे काही समाजकंटकांच्या डोळ्यात ते खुपत होते," असे डॉ. आरोटे म्हणाले.

संजय भोकरे यांच्या जीवाला अजूनही धोका असल्याचे सांगत त्यांना उच्चस्तरीय सुरक्षा देण्याची मागणीही करण्यात आली आहे. "ज्या पद्धतीने त्यांच्यावर कट रचला गेला, त्यावरून त्यांना अजूनही धोका आहे. त्यामुळे शासनाने त्यांना तातडीने झेड प्लस सुरक्षा द्यावी," अशी मागणी डॉ. आरोटे यांनी केली.

या प्रकरणाच्या निषेधार्थ राज्यातील पत्रकारांनी एकत्र येण्याचे आवाहन महाराष्ट्र राज्य पत्रकार संघाने केले आहे. प्रत्येक जिल्हा व तालुकास्तरावर निवेदने देऊन पत्रकार सुरक्षेचा मुद्दा लावून धरण्यात येणार असल्याचे सांगण्यात आले.

"आम्ही चांगल्याला चांगले म्हणतो आणि वाईटाला वाईट म्हणण्याची ताकद ठेवतो. पत्रकारांवर अन्याय झाला तर महाराष्ट्र राज्य पत्रकार संघ शांत बसणार नाही," असा इशाराही डॉ. आरोटे यांनी दिला.

संजय भोकरे हत्याकट प्रकरणामुळे राज्यात पत्रकार सुरक्षेचा मुद्दा पुन्हा एकदा ऐरणीवर आला आहे. पत्रकारांवर वाढते हल्ले, धमक्या आणि दबावाच्या घटनांमुळे स्वतंत्र पत्रकारिता धोक्यात येत असल्याची भावना पत्रकार संघटनांनी व्यक्त केली आहे. या प्रकरणात दोषींना कठोर शिक्षा होऊन खरा मास्टरमाइंड समोर येतो का, याकडे आता संपूर्ण राज्याचे लक्ष लागले आहे.

**"पत्रकार सुरक्षित नसतील तर लोकशाही धोक्यात"**

पत्रकारांवरील वाढत्या हल्ल्यांबाबत चिंता व्यक्त करताना डॉ. आरोटे यांनी शासनावरही टीका केली. "पत्रकार हा लोकशाहीचा चौथा स्तंभ आहे. जर पत्रकारांनाच संरक्षण नसेल, तर लोकशाही सुरक्षित राहणार नाही. आज संजय भोकरे यांच्यावर ही वेळ आली आहे; उद्या राज्यातील कोणत्याही पत्रकारावर येऊ शकते," असे ते म्हणाले. त्यांनी मुख्यमंत्री आणि गृहमंत्र्यांना उद्देशून म्हटले की, "या प्रकरणाचा तपास केवळ औपचारिक राहू नये. या कटामागील प्रत्येक सूत्रधार बाहेर आला पाहिजे. यासाठी विशेष तपास पथक (SIT) स्थापन करून स्वतंत्र चौकशी करावी."

## थोडक्यात पण महत्वाचे

### अधिक मासमुळे आता थेट पुढच्या वर्षीच 'लग्नगाठ'; आठ महिने खंड



अहिल्यानगर (स. गांवकरी) : लग्न समारंभासाठी मुहूर्त पाहिला जातो. शुभ मुहूर्ताच्या तारखेनंतरच लग्न निश्चित ठरविले जाते. लग्नाचा सिझन जोरात सुरू असताना अधिक महिन्याची एंट्री होणार आहे. १७ मे पासून पुढील आठ महिने शुभमुहूर्ताच्या तारखा नाहीत. शुभ मुहूर्त उपलब्ध नसल्याने ज्यांच्या घरात लग्नाची बोलणी सुरू आहेत, अशा लग्नाळुची अडचण होणार आहे. तसेच लग्नासाठी शुभमुहूर्तासाठी २०२७ ची वाट पाहवी लागणार आहे. यंदा १७ मे ते १५ जून या काळात अधिक मास आहे. हिंदू धर्मशास्त्रानुसार या काळात कोणतेही शुभ कार्य केले जात नाही. त्यानंतर लगेच जुलैपासून गुरू आणि शुक्र ग्रहांचा अस्त होणार असून चातुर्मासाची सुरुवात होईल. या काळात मंगल कार्ये वर्ज्य मानली जातात. तसेच ऑक्टोबरपासून सिंहस्थ कुंभमेळ्याचे आयोजन होत असल्याने त्याचाही परिणाम विवाह मुहूर्तावर होणार आहे. यामुळे विवाहासाठी मुहूर्ताचा मोठा तुटवडा भासणार आहे. त्यामुळे विवाह इच्छुकांचा कोंडमारा होणार आहे. अधिक मास असल्याने शुभकार्ये बंद, जुलैपासून गुरू-शुक्राचा अस्त आणि चातुर्मास प्रारंभ, ऑक्टोबरमध्ये सिंहस्थ कुंभमेळ्यामुळे मुहूर्ताची अडचण, पुढील मुहूर्त थेट जानेवारी २०२७ मध्ये.

### अहिल्यानगर जिल्हयात उष्णतेची लाट राहणार

अहिल्यानगर (स. गांवकरी) : भारतीय हवामान विभागाने अहिल्यानगर जिल्ह्यात १२ ते १४ मे दरम्यान उष्णतेची लाट राहणार असल्याचा अंदाज व्यक्त केला आहे. त्यानुसार जिल्हा प्रशासनाने या तीन यलो अलर्ट जाहीर करत नागरिकांना उन्हापासून सतर्क राहण्याचे आवाहन केले आहे.

### सनातन धर्मसभेच्या वतीने अधिक मास धार्मिक कार्यक्रमांचे आयोजन

अहिल्यानगर (स. गांवकरी) : सनातन धर्मसभेच्या वतीने अधिकमासानिमित्त १७ मे ते १५ जून रोजी विविध धार्मिक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे. १७ मे ते १५ जून रोजी सकाळी ७.३० ते १२ श्री विष्णुसहस्त्रनाम पठण,श्री विष्णू पुजा व याग १७ मे ते २३ मे रोजी सायंकाळी ६ ते ८ ह.भ. प. सतिष कुलकर्णी व सहकारी यांचे संगीत. गुरु चरित्र पारायण. २४ मे सायंकाळी ६ ते ८ वाजता ह.भ.प. निळकंठ देशमुख यांचे माऊली संजीवन समाधी सोहळा या विषयावर प्रवचन, २५ मे रोजी सायंकाळी ५ ते ८ प.पू . कपील शास्त्री कवीश्वर यांचे प्रवचन २६ मे ते ३१ मे दररोज दुपारी २ ते ६ वाजता गीता महिला मंडळाच्या वतीने ग्रंथराज श्री ज्ञानेश्वरी पारायण, २६ मे ते २७ मे ह.भ.प.कु.रेणुका निसळ यांचे नारदीय किर्तन, २८ मे ते २९ मे सायंकाळी ६ ते ८ वाजता ह.भ.प.योगेश कुलकर्णी यांचे नारदीय किर्तन, ३० मे ते ३१ मे सायंकाळी ६ ते ८ ह.भ.प. डॉ.नेहा धर्माधिकारी ( वाळुंजकर) यांचे नारदीय किर्तन, १ जून सायंकाळी ६ ते ८ ह.भ.प. निळकंठ देशमुख यांचे प्रवचन, २ जून ते ४ जून सायंकाळी ६ ते ८ आळंदीचे ह.भ.प. नरहरी महाराज सांगळे यांचे ज्ञानेश्वरीवरती प्रवचन, ५ जून ते ७ जून सायंकाळी ६ ते ८ आळंदी चे ह.भ.प. कैलास महाराज येवले यांचे ज्ञानेश्वरीवरती प्रवचन, ८ जून ते १४ जून सायंकाळी ५ ते ८ छत्रपती संभाजीनगर चे भागवताचार्य भगवान मुरलीधर डोशी यांचे भागवत कथासार निरूपण, १५ जून दुपारी १२ ते २ पूर्णाहुती व महाप्रसादाने या कार्यक्रमाची सांगता होणार आहे. अधिक मासानिमित्त होणाऱ्या कार्यक्रमात श्री विष्णूपूजन व श्री विष्णू याग यामध्ये सहभागी होणारे यजमान यांनी वे. शा. सं निलेश धर्माधिकारी व वे. शा. सं बंडोपंत धर्माधिकारी, वे.शा.सं. सोमनाथ मुळे, वे.शा.सं.उमेश वाळुंजकर यांच्याशी संपर्क साधावा. जास्तीत जास्त संख्येने या कार्यक्रमात सहभागी व्हावे असे आवाहन सनातन धर्मसभेचे अध्यक्ष वेदमूर्ती महेशजी रेखे, निळकंठ देशमुख, उमेश नगरकर व विश्वस्तांनी केले.

### विकासकामांच्या मूल्यांकन तपासणीत केवळ कागदी घोडे ?

तामसा (स. गांवकरी) : हदगाव तालुक्यातील ग्रामपंचायतीत विकासकामांच्या मूल्यांकन तपासणीसाठी आलेल्या पथकाच्या कामकाजावर ग्रामस्थांनी नाराजी व्यक्त केली आहे. शासनाच्या विविध विकास योजनांची प्रत्यक्ष पाहणी, कामांची गुणवत्ता आणि निधीचा उपयोग तपासण्याऐवजी केवळ अंगणवाडी व शाळेच्या दप्तरांची औपचारिक तपासणी करण्यात आल्याचा नागरिकांकडून बोलल्या जात आहे. मुख्यमंत्री समृद्ध ग्राम पंचायत अभियानांतर्गत ग्रामपंचायतींच्या विकासकामांचे मूल्यांकन सुरू असून त्यासाठी तालुकास्तरावर विविध पथके नियुक्त करण्यात आली आहेत. तालुक्यात आलेल्या पथकाने दिवसभर येवली, पिंपळगाव मूल्यांकन तपासणी करून रात्री वेट अँड वॉच भूमिकेत बसलेले नागरिकांनी 9 वाजेपर्यंत वाट पाहावा लागली होती.

## पोलीस ठाणे हद्दीत सुरू असलेल्या जुगार अड्ड्यांवर छापा

अहिल्यानगर : (स. गांवकरी)

पोलीस अधीक्षक मुम्मका सुदर्शन यांच्या आदेशानुसार भिंगार कॅम्प पोलिसांनी तोफखाना व एमआयडीसी पोलीस ठाणे हद्दीत सुरू असलेल्या बिंगो आणि हारजितीच्या जुगार अड्डयांवर गेल्या रविवार (१० मे) रोजी सायंकाळी धडक कारवाई करत चार वेगवेगळ्या ठिकाणी एकाचवेळी छापे टाकले. या कारवाईत एकूण सहा लाख ३५ हजार ८५० रूपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला असून २० जणांना ताब्यात घेण्यात आले आहे. याप्रकरणी एमआयडीसी आणि तोफखाना पोलीस ठाण्यात गुन्हे दाखल करण्यात आले आहेत.

शहरातील विविध भागात बिंगो व जुगार सुरू असल्याची माहिती अधीक्षक सुदर्शन यांना मिळाल्यानंतर त्यांनी भिंगारचे सहाय्यक निरीक्षक जगदीश मुलगीर यांना कारवाईचे आदेश दिली. त्यानुसार उपनिरीक्षक गजेंद्र इंगळे व योगेश पवार यांच्या नेतृत्वाखालील पथकाने छापे टाकले. पहिली कारवाई आंबेडकर चौक, गांधीनगर-बोल्हेगाव येथे करण्यात आली. येथे पोलिसांनी दोघांना पकडले. एक लाख २१ हजार २०० रूपयांचा मुद्देमाल जप्त केला. दुसरी कारवाई शेंडी बायपास परिसरातील दूध डेअरी चौकाजवळ, हॉटेल मातोश्री शेजारी असलेल्या पत्र्याच्या शेडमध्ये करण्यात आली.

## रावेर येथे लोक न्यायालयाने ४४ प्रकरने समजुतीने निकाली

रावेर : (स. गांवकरी)



महाराष्ट्र विधी सेवा प्राधिकरणा तर्फे दिनांक नुकतेच रावेर येथे सकाळी 10 वाजता तालुका विधी सेवा समिती व वकील संघ रावेर यांचे संयुक्त विद्यमाने राष्ट्रीय लोक अदालतीचे आयोजन करण्यात आले होते . दिवाणी व फौजदारी न्यायालय रावेर परिसरात आयोजित करण्यात आले याप्रसंगी न्यायाधीश एस.बी. तिवारी साहेब तसेच रावेर वकील संघाचे अध्यक्ष ॲड. धनराज ई. पाटील, उपाध्यक्ष ॲड. तुषार पी चौधरी, सचिव ॲड. के. बी. खान, सहसचिव ॲड. जितेंद्र दांडगे, पंच सदस्य ॲड. विनोद प्रल्हाद चौधरी, सरकारी वकील अभिजित अंदोरे तसेच ॲड. एस एम युसुफ, ॲड. व्ही. पी. महाजन, ॲड. जमील शेख, ॲड. एम.बी. चौधरी, ॲड. आर.एन. चौधरी, ॲड. विपिन गडे, ॲड. योगेश गजरे, ॲड. सुभाष धुंदले, ॲड. जगदीश महाजन, ॲड. एस. एस. जोशी, ॲड. बी.डी. निळे, ॲड. प्रमोद विचवे. ॲड. दिपक एच. गाढे , ॲड. किशोर पाटील, ॲड. लक्ष्मीकांत शिंदे, ॲड. सुभान शेख, ॲड. आर.ए. पाटील, ॲड. सतिष वाघोदे, ॲड. मुजाहीद शेख, ॲड. रवी पाटील, ॲड. प्रदीप लहासे, ॲड. मोहन कोचुरे, ॲड. राजेश रायमाळे, ॲड. अमोल नाईक, ॲड. नितिन चौधरी, ॲड. डि. एस. लहासे, ॲड. एस. एन. सोनार, ॲड. संदेश पाटील तसेच न्यायालयीन कर्मचारी सहा.अधिक्षक व्ही. एम. चौधरी, लघुलेखक एम. जे. शिंपी, वरिष्ठ लिपिक बी. के. तडवी, बी. डी. बारी, कनिष्ठ लिपिक पी. यु. पाटील, एस.के. जोशी, एस. एफ. वाणी, व्ही. ए. चौधरी, डि. आर. जावळे, बी. एस. बारी, शिपाई बी. पी. चौधरी आदी उपस्थित होते. या राष्ट्रीय लोक अदालत मध्ये आपसात समजूतीने एकूण 44 प्रकरणे निकाली निघाली.

## जबरी चोरी करणारे सराईत आरोपीची टोळी जेरबंद

अहिल्यानगर : (स. गांवकरी)




नगर तालुका पोलीस स्टेशन गु.र.नं. 317/2026 भारतीय न्याय संहिता २०२३ चे कलम 309(6) प्रमाणे गेल्या दि.२१ एप्रिल रोजी गुन्हा दाखल असुन सदर गुन्ह्यामध्ये फिर्यादी सौ ताराबाई मुरलीधर कोकाटे हे शेतामध्ये काम करत असतांना कोणीतरी अज्ञात चोरट्याने त्यांचे गळ्यातील ७८,०००/- रुपये किमतीचे सोन्याचे दागिने बळजबरीने चोरुन नेलेले आहेत. सदर गुन्हा उघडकीस आणणेकरीता स्थानिक गुन्हे शाखेचे पोनि श्री किरणकुमार कबाडी यांचे नेतृत्वाखाली सपोनि/ हरिष भोये, महादेव गुट्टे पोलीस अंमलदार गणेश लोंढे, फुरकान शेख, श्यामसुंदर जाधव, बाळासाहेब खेडकर, भाऊसाहेब काळे, किशोर शिरसाठ, मनोज साखरे, सुनिल मालणकर, आकाश काळे, बाळासाहेब गुंजाळ, योगेश कर्डीले, महिला पोलीस अंमलदार भाग्यश्री भिटे, किरण ठुबे, चालक भगवान धुळे, अरुण मोरे यांचे पथक तयार करुन सदर पथकास गुन्हा उघडकीस आणणेकामी सुचना व मार्गदर्शन करुन पथकास रवाना करण्यात आले होते.

स्थानिक गुन्हे शाखेचे वरील पथकाने सदर गुन्हा उघडकीस आणण्याचे दृष्टीने घटनाठिकाणी भेट देवुन घटनाठिकाणची पाहणी केली. सदर गुन्ह्यातील आरोपींची माहिती काढत असतांना व्यवसायीक कौशल्याचे आधारे सदरचा गुन्हा हा रेकॉर्डवरील आरोपी नामे गणेश दिवानजी काळे (रा. वाकोडी ता.जि. अहिल्यानगर) याने त्याचे साथीदारासह केला असुन तो त्याचे साथीदारासह अहिल्यानगर सोलापुर जाणारे रोडवर वाकोडी गावचे शिवारात जुना जकात नाका येथे दोन मोटार सायकलवर आले असल्याची माहिती मिळाली.

त्यानंतर पथकाने मिळालेल्या माहितीचे आधारे सदर ठिकाणी जावुन खात्री करता जुना जकात नाका येथे दोन मोटार सायकल जवळ तीन इसम उभे असल्याचे दिसुन आले. पथक त्यांना ताब्यात घेण्यासाठी जात असतांना ते तेथुन पळुन जावु लागले त्यावेळी पथकाने त्यांचा पाठलाग करुन त्यांना ताब्यात घेवुन त्यांचे नांव गाव विचारले असता त्यांनी त्यांचे नांवे १) गणेश दिवानजी काळे (वय-२८ वर्षे रा.वाकोडी ता.जि. अहिल्यानगर) , २) विनय उर्फ टकल्या योगेश काळे (वय-१९ वर्षे रा. वाळुंज ता.जि. अहिल्यानगर) , ३) रोहित लल्या भोसले (वय-२३ वर्षे रा. सराटी वडगांव ता.आष्टी जि. बीड) असे असल्याचे सांगितले.

ताब्यातील इसम नामे गणेस दिवानजी काळे याचेकडे गुन्ह्याबाबत सखोल व बारकाईने विचारपुस करता त्याने त्याचे आणखी दोन साथीदासह गुन्हा केल्याची कबुली दिली आहे.याबाबत पथकाने गुन्ह्यामध्ये चोरी केलेले दागिने आरोपीचे कब्जातुन व आरोपीचे राहते घरातुन ९,०४,८००/- रु कि.चे १०२ ग्रॅम वजनाचे सोन्याचे दागिणे, ४५,०००/-रु कि.चे तीन मोबाईल, १,७०,०००/- रु कि.चे दोन मोटार सायकल असा एकुण ११,१९,८००/- रुपये किमतीचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे.

## इन्स्टाग्राम वादातून दोन भावांवर प्राणघातक हल्ला

अहिल्यानगर : (स. गांवकरी)



शहरातील नालेगाव भागात जुन्या वादातून दोन सख्ख्या भावांवर चॉपर आणि चाकूने जीवघेणा हल्ला झाल्याची घटना घडली आहे. इन्स्टाग्रामवरील वादाचे रूपांतर हाणामारीत झाले असून, यामध्ये अभिषेक शाम टोणे आणि कुबेर टोणे हे दोन भाऊ गंभीर जखमी झाले आहेत. मिळालेल्या माहितीनुसार, अभिषेक टोणे हे घराबाहेर असताना चिदंबर शिंदे आणि नटराज शिंदे हे तिथे आले. आरोपी चिदंबरच्या हातात चॉपर तर नटराजकडे चाकू होता. जुन्या वादाचा राग मनात धरून त्यांनी कुबेर टोणे याच्या डोयात आणि हातावर वार केले. मुलाला वाचवण्यासाठी धावलेल्या अभिषेकवरही आरोपींनी हल्ला केला. नटराजने अभिषेकच्या डाव्या डोळ्यापाशी वार केला, तर चिदंबरने कानाच्या मागे चॉपरने मारून गंभीर जखमी केले. भरवस्तीत झालेल्या या हल्ल्यामुळे परिसरात मोठी खळबळ उडाली. जखमींच्या आईने आरडाओरडा केल्यानंतर परिसरातील नागरिक मदतीला धावून आले, हे पाहून दोन्ही आरोपी घटनास्थळावरून पळून गेले. जखमी भावांना तातडीने जिल्हा रुग्णालयात दाखल करण्यात आले आहे, तर एकावर खाजगी रुग्णालयात उपचार सुरू आहेत. या प्रकरणी कोतवाली पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला असून, साहाय्यक पोलीस निरीक्षक तेजस्विनी थोरात या प्रकरणाचा पुढील तपास करत आहेत.

## पारनेरच्या वीज प्रश्नांवर मुंबईत उच्चस्तरीय बैठक

- आमदार दातेंची माहिती
- धोत्रे येथे २२० के.व्ही. उपकेंद्राला गती
- बाभुळवाडा ट्रान्सफॉर्मर क्षमतावाढीचे तातडीचे आदेश

पारनेर : (स. गांवकरी)




पारनेरच्या वीज प्रश्नांवर मुंबईत उच्चस्तरीय बैठक पारनेर तालुक्यातील वाढत्या वीज समस्यांबाबत आमदार काशिनाथ दाते सरांच्या पाठपुराव्याला यश मिळाले असून, ऊर्जा राज्यमंत्री मेघनाताई बोर्डीकर यांच्या प्रमुख उपस्थितीत मंत्रालयात महावितरणच्या वरिष्ठ अधिकाऱ्यांसमवेत महत्त्वपूर्ण बैठक पार पडली. यावेळी महापारेषण संचालक सतीश चव्हाण, कार्यकारी संचालक धनंजय औडेकर, अधिक्षक अभियंता प्लॅनिंग दाभरडे, कार्यकारी अभियंता योगेश चव्हाण उपस्थित होते. बैठकीत पारनेर तालुक्यातील कमी दाबाचा वीजपुरवठा, लांब पल्ल्याच्या ३३ के.व्ही. वाहिन्या, अपुरी ट्रान्सफॉर्मर क्षमता तसेच नवीन उपकेंद्र उभारणी या विषयांवर सविस्तर चर्चा करण्यात आली. पारनेर तालुक्यात सध्या सुपा व बाभुळवाडा येथे १३२ के.व्ही. उपकेंद्र असून, केडगाव (जि. अहिल्यानगर), शिरूर व आळेफाटा (जि. पुणे) येथूनही विविध ३३/११ के.व्ही. उपकेंद्रांना वीजपुरवठा केला जात आहे. मात्र अनेक वाहिन्यांची लांबी ४० ते ५० किलोमीटरपर्यंत असल्याने कमी दाबाने वीजपुरवठा, वारंवार तांत्रिक बिघाड आणि दुरुस्तीसाठी होणारा विलंब यामुळे ग्राहकांना मोठा त्रास सहन करावा लागत असल्याचे आमदार दाते यांच्या माध्यमातून बैठकीत निदर्शनास आणून देण्यात आले. आळेफाटा येथून येणाऱ्या ३३ के.व्ही. वाहिनीवर अळकुटी, आणे, पळसपूर व वारणवाडी अशी चार उपकेंद्रे जोडलेली असून या वाहिनीची लांबी तब्बल ५० कि.मी. आहे. तसेच बाभुळवाडा येथून निघणाऱ्या सहा वाहिन्यांवर कान्हूर पठार, टाकळी ढोकेश्वर व निघोज परिसरातील प्रत्येकी दोन उपकेंद्रे जोडलेली आहेत. केडगाव येथून येणाऱ्या वाहिनीवर भाळवणी, गोरेगाव व ढवळपुरी ही उपकेंद्रे जोडलेली असून वाहिन्यांचे अंतर जास्त असल्याने वारंवार अडचणी निर्माण होत असल्याचे स्पष्ट करण्यात आले. वडगाव सावताळ – वनकुटे परिसरातील नवीन सबस्टेशनच्या मागणीबाबतही सकारात्मक चर्चा झाली. संबंधित प्रस्ताव तातडीने सादर करण्याच्या सूचना देत त्यावर लवकरच कार्यवाही केली जाईल, असा विश्वास मंत्री बोर्डीकर यांनी व्यक्त केला तर खडकवाडी व अळकुटी येथे नवीन सेक्शनच्या मागणीवर ग्राहकसंख्येचा आढावा घेऊन निर्णय घेतला जाईल, असेही त्यांनी यावेळी स्पष्ट केले. दरम्यान, बाभुळवाडा येथील १३२ के.व्ही. उपकेंद्रात सध्या कार्यरत असलेल्या २५ MVA क्षमतेच्या दोन पॉवर ट्रान्सफॉर्मरची क्षमता वाढवून प्रत्येकी ५० MVA करण्यास मंजुरी मिळालेली असून त्याची अंमलबजावणी रखडल्याचे बैठकीत निदर्शनास आणून देण्यात आले. यावर मंत्री बोर्डीकर यांनी तातडीने कार्यवाही करण्याचे आदेश संबंधित अधिकाऱ्यांना दिले. तसेच RDSS योजनेंतर्गत सुरू असलेल्या कामांमध्ये होत असलेल्या दिरंगाईवरही नाराजी व्यक्त करत संबंधित ठेकेदारांना कामे जलदगतीने पूर्ण करण्याचे आदेश देण्यात आले असून या बैठकीमुळे पारनेर तालुक्यातील दीर्घकालीन वीज समस्यांच्या निराकरणाला गती मिळणार असल्याची अपेक्षा व्यक्त होत आहे.

# स्वरा तळपे, रिया डावकर व तनुश्री पारधीची यशस्वी झेप










शिवनेरी : (स. गांवकरी)

जुन्नर तालुक्याच्या पश्चिम टोकावरील अती दुर्गम आदिवासी भागात शिक्षण घेणाऱ्या तिन विद्यार्थ्यांनी प्रतिकूल परिस्थितीवर मात करत एस.एस.सी. परीक्षेत उल्लेखनीय यश संपादन केले डॉ.बाबासाहेब आंबेडकर विद्यालय, तांबे या विद्यालयाचा दहावीचा निकाल तब्बल ९५.६५ टक्के लागला आहे . कु. स्वरा नानाभाऊ तळपे हिने ७६.६० टक्के गुण मिळवत प्रथम क्रमांक , कु.रिया दुर्गादास डावखर हिने ७५.४० टक्के गुण मिळवत द्वितीय क्रमांक तर कु.धनश्री बाबुराव पारधी हिने ६५.६० टक्के गुण मिळवत तृतीय क्रमांक मिळवला. अती दुर्गम भागात ट्युशनची कोणतीही सुविधा नाही. आई-वडील मोलमजुरी करून संसार करत आहे . घरातील भावंड वस्तीगृहात शिक्षण घेत आहे. घरची सर्व कामे सांभाळत, वेळप्रसंगी शेतात काम करत, सुट्टीच्या दिवशी मोलमजुरी करून आई-वडिलांना हातभार लावत या विद्यार्थ्यांनी जिद्द, चिकाटी आणि अथक मेहनतीच्या जोरावर हे यश संपादन केले .

या तिन्ही विद्यार्थ्यांनी प्रत्येक शालेय उपक्रमात तिचा सक्रिय सहभाग असतो. स्वाभिमानी, मेहनती आणि अभ्यासू असलेल्या यशामुळे संपूर्ण गावाला अभिमान वाटत आहे.

या विद्यालयातील बहुतांश पालक अशिक्षित आहेत. अतिरिक्त तासांची सुविधा नाही . तरीही विद्यार्थी स्वअभ्यास, जिद्द आणि मेहनतीच्या बळावर शिक्षण घेत आहेत. विशेष म्हणजे अनेक विद्यार्थी दररोज २ ते ३ किलोमीटर पायी प्रवास करून शाळेत येतात. या यशामुळे ग्रामीण आणि आदिवासी भागातील विद्यार्थ्यांमध्ये नवा आत्मविश्वास निर्माण झाला आहे. या विद्यालयातील मुख्याध्यापक, सर्व शिक्षक, शिक्षकेत्तर कर्मचारी या सर्वांचे पालकांनी व ग्रामस्थांनी अभिनंदन केले आहे .



नेवासा (प्रतिनिधी) : श्रीरामपूर तालुक्यातील खिर्डी येथील हनुमान मंदिर प्रांगणात सुरू असलेल्या अखंड हरिनाम सप्ताह व ग्रंथराज ज्ञानेश्वरी पारायण सोहळयाची तीर्थक्षेत्र नेवासा येथील संत ज्ञानेश्वर महाराज संस्थानचे प्रमुख महंत वेदांताचार्य हभप देविदासजी महाराज म्हस्के शास्त्री यांच्या काल्याच्या किर्तनाने काल्याची दहीहंडी फोडून मंगळवारी दि.१२ मे रोजी भक्तिमय वातावरणात सांगता करण्यात आली.सप्ताह सोहळयाचे हे ३१ वे वर्ष होते. जीवनात मनात भाव धरून एकदा तरी ग्रंथराज ज्ञानेश्वरीचे वाचन करा असे आवाहन वेदांताचार्य देविदासजी महाराज म्हस्के शास्त्री यांनी यावेळी बोलतांना केले.

## थोडक्यात बातम्या...

### नांदेड जिल्ह्यासाठी हवामान खात्याचा इशारा; १४ व १५ रोजी यलो अलर्ट जारी

नांदेड जिल्हा (स. गांवकरी) : प्रादेशिक हवामानशास्त्र केंद्र मुंबई यांनी दिलेल्या सूचनेनुसार नांदेड जिल्ह्यासाठी 14 व 15 मे 2026 हे दोन दिवस येलो अलर्ट जारी केलेला आहे. या तीन दिवसांच्या काळात जिल्ह्यात तुरळक ठिकाणी उष्मालाट असण्याची अधिक शक्यता वर्तविली आहे. या नैसर्गिक आपत्ती संदर्भात सर्व संबंधित यंत्रणा आणि जनतेने खबरदारी घ्यावी. नागरिकांनी खबरदारीची उपाययोजना म्हणून पुढील प्रमाणे काळजी घ्यावी, असे आवाहन जिल्हा प्रशासनाने केले आहे. तहान नसली तरी पुरेसे पाणी प्या. अपस्मार, हृदयरोग, मूत्रपिंड, यकृतविषयक आजारांमुळे ज्यांना शरीरात द्रवपदार्थ टिकवण्याचा प्रश्न येतो, त्यांनी डॉक्टरांच्या सल्ल्यानंतरच द्रवपदार्थ किंवा पाणी प्राशन करावे. ओआरएस (ORS) म्हणजेच तोंडान घ्यावयाचे शरीरातले पाणी वाढवणारे द्रवपदार्थ, घरगुती लस्सी, भाताची पेज, लिंबूपाणी, ताक, नारळाच पाणी घ्या. हलक्या रंगाचे, वजनाला हलके आणि सैलसर सुती कपडे वापरा. घराबाहेर असाल तर डोके झाका. एखादे कापड वापरा, टोपी घाला किंवा छत्री वापरा. डोळ्यांच्या सुरक्षेसाठी गॉगल वापरा आणि उन्हापासून कातडीचाही बचाव करायला सनस्क्रीन वापरा. उन्हात जायचे टाळा, विशेषतः दुपारी १२ ते ०३ मध्ये दुपारी बाहेर असताना श्रमाची कामे टाळा. अनवाणी बाहेर जाऊ नका. अतिउष्णतेच्या काळात स्वयंपाक करणे टाळा. दार खिडक्या उघड्या ठेऊन अन्न शिजवण्याचे क्षेत्र स्वयंपाकघर हवेशीर राहील हे बघा. अल्कोहोल म्हणजे दारू, चहा, कॉफी, शीतपेये टाळा त्यातून शरीरातले पाणी कमी होते. उच्च प्रथिनयुक्त मिठाचं प्रमाण जास्त असलेले किंवा तिखट तसेच तेलकट अन्न खाऊ नका. शिळंपाकं खाऊ नका.चारचाकी वाहन लावून ठेवताना त्यात लहान मुले किंवा प्राणी ठेऊ नका. चमकणारे दिवे किंवा बल्ब्ज वापरू नका, त्यातून अनावश्यक उष्णता निर्माण होते.

### कायदेशीर कार्यवाही करण्याचे जिल्हाधिकारी यांच्याकडे मागणी

नांदेड जिल्हा (स. गांवकरी) : नांदेड जिल्हा मजुर फेडरेशन नांदेड मध्ये संचालक पदावर कार्यरत असलेले उत्तम धुपसिंग राठोड (देवशोत) ह्या नावाचे तेलगंना व महाराष्ट्र राज्यात दोन्ही राज्याची फसवणुक करून एकाच नावाने विविध योजनेचे लाभ घेत असल्यामुळे ह्या व्यक्तीवर कायदेशीर कार्यवाही करण्याची जिल्हाधिकारी यांच्या कडे निवेदना द्वारे केली मागणी . जिल्हा मजुर फेडरेशन नांदेड मध्ये संचालक पदावर कार्यरत असलेले उत्तम धुपसिंग राठोड (देवशोत) ह्या नावाचे तेलगंना व महाराष्ट्र येथे दोन्ही राज्यात एकाच नावाने लाभ घेत असल्यामुळे ह्या संमधीत व्यक्तीवर कायदेशीर कार्यवाही करून गुन्हा दाखल करणे बाबत. एका निवेदनाद्वारे अक्षेप लेखी स्वरूपात नोंदवित असल्यामुळे नांदेड जिल्हा मजुर सहकारी फेडरेशन लि. नांदेडच्या प्रारूप यादी मधुन चेअरमन धुपसिंग हे मागासवर्गीय मजुर सहकारी संस्था मर्यादित तोटंबा ता. किनवट जि. नांदेड चे उत्तमराव धूपसिंग राठोड (देवशोत) तेलगांना निर्मल जिल्हातील आधार क्रमांक 5299 5953 0675 निवासस्थान बाबत करपावती मजुर संस्थेचे जीएसटी (GST no. 27AAAAC2908GIZ3) नोंदणी प्रमाण पत्रावर त्यांच्या वास्तवाचा पुरावा म्हणून सध्या तेलंगना राज्यात नोंद आहे. त्यांचा तेलगांणा राज्यातिल RC NO. 369320181917, घर क्र. 1-4-164/2, ADARSH NAGAR, WARD-21(V) NIRMAL त्यांच्या कुटूंबातील सदस्य् 1) पत्नी सौ. नंदाबाई उत्तमराव (देवशोत) राठोड 2) साईराज शेखर उत्तमराव (देवशोत) राठोड 3) साई विक्रमराज उत्तमराव (देवशोत) राठोड 4) कु. साई शारदा उत्तमराव (देवशोत) राठोड निर्मल जिल्हातील मंजुलापूर (आदर्शनगर) येथील यादी क्र. 177 व 73, 74 मतदार यादीत नाव समाविष्ट आहेत तथा महाराष्ट्रातील मतदान यादी किनवट विधानसभा -83 विभागाचा क्रमांक व नाव मानसींग नाईक तांडा यार्दा प्रभाग क्र. 311 अन क्र. 263 व ईपीक नं AFL2795581 नाव उत्तमराव धुपसिंग राठोड, 2) नंदाबाई उत्तम राठोड ईपीक नं AFL0649507 3) साईराज शेखर उत्तमराव राठोड ईपीक ने AFL4311452, 4) साईविक्रम उत्तमराव राठोड ईपीक नं AFL4311460 वास्तविक पाहता साहेब उत्तम 'धुपसिंग राठोड ह्यांचा मुलगा किनवट तालुक्यातील मानसिंगनाईक तांडा (तोटंबा) येथील रहिवाशी होता पण 30 वर्षापुर्वी निर्मल येथे स्थलांतरीत झाला होता व त्याच्या मुलाचे पुर्ण शिक्षण तिथेच पुर्ण झालेत तेलगांना राज्यात बंजारा समाज लबाना ह्या जातीने ओळखतात अनुसूचित जमाती मधील (ST) चा फायदा घेण्यासाठी तेलगांना मध्ये स्थलांतरीत झाला होता.

### "ऑपरेशन क्रॅक डाऊन" की केवळ दिखाऊ कारवाई?

किनवट (स. गांवकरी) : जिल्हा पोलीस प्रशासनाने मोठ्या गाजावाजात सुरू केलेल्या "ऑपरेशन क्रॅक डाऊन" मोहिमेअंतर्गत अवैध धंद्यांवर कठोर कारवाई केली जात असल्याचे सांगितले जात असले, तरी किनवटमध्ये झालेल्या कारवाईवरून अनेक प्रश्न उपस्थित होत आहेत. जिल्ह्यात विविध ठिकाणी लाखोंच्या अवैध धंद्यांवर धडक कारवाया होत असल्याचे चित्र असताना, किनवटमध्ये केवळ ५ हजार ९०० रुपयांचा मुद्देमाल जप्त करून "मोठी कारवाई" झाल्याचा भास निर्माण केला जात आहे का? अशी चर्चा आता नागरिकांमध्ये सुरू झाली आहे. पोलीस अधीक्षक अविनाश कुमार यांनी जिल्ह्यातील सर्व पोलीस ठाण्यांना अवैध धंदे बंद करण्याचे आदेश दिल्यानंतर अनेक भागात दारू, मटका, जुगार, गुटखा आणि इतर अवैध व्यवसायांवर कारवाई करण्यात आली. मात्र, किनवट तालुक्यात अनेक वर्षांपासून खुलेआम सुरू असलेल्या अवैध धंद्यांवर केवळ किरकोळ कारवाई करून पोलिसांनी आपली जबाबदारी पूर्ण केल्याचे दाखवले जात आहे का, असा सवाल उपस्थित होत आहे. दि. ११ मे रोजी गोकुंदा परिसरात पोलिसांनी देशी दारूच्या केवळ ८५ बाटल्या आणि मटका साहित्य जप्त करून एकूण ५९०० रुपयांचा मुद्देमाल हस्तगत केल्याचे प्रसिद्धीपत्रकात नमूद करण्यात आले. मात्र, किनवट शहर व तालुक्यात सुरू असलेल्या मोठ्या प्रमाणातील अवैध धंद्यांच्या तुलनेत ही कारवाई अत्यंत किरकोळ असल्याची प्रतिक्रिया नागरिक व्यक्त करत आहेत.

# राष्ट्रीय लोकअदालतीमध्ये १६८० प्रकरणे निकाली

नांदेड जिल्हा : (स. गांवकरी)

महाराष्ट्र राज्य विधी सेवा प्राधिकरण, मुंबई यांच्या आदेशान्वये आणि प्रमुख जिल्हा न्यायाधीश तथा अध्यक्ष जिल्हा विधी सेवा प्राधिकरणाचे अध्यक्ष नरेंद्र के. ब्रह्मे यांच्या अध्यक्षतेखाली शनिवार 9 मे, 2026 रोजी जिल्ह्यातील सर्व न्यायालायात राष्ट्रीय लोकअदालतीचे आयोजन करण्यात आले होते.

या राष्ट्रीय लोकअदालतीमध्ये मोटार अपघात नुकसान भरपाईची प्रकरणे, दिवाणी व फौजदारी तडजोड पात्र प्रकरणे, कौटुंबिक वाद प्रकरण, एन.आय. ॲक्टची प्रकरणे, नांदेड वाघाळा शहर महानगरपालिकेची वाद पूर्व मालमत्ता कराची प्रकरणे, गुन्हा कबुलीची प्रकरणे, आरटीओ व रेल्वे पोलीस विभागाची प्रकरणे, कौटुंबिक न्यायालय, कामगार न्यायालय, सहकार न्यायालय, जिल्हा ग्राहक तक्रार निवारण मंच



**७ कोटी ६८ लाख रुपयांची तडजोड**

प्रकरणे, सर्व बँक प्रकरणे, फाईनान्स कंपनीची प्रकरणे, पंचायत समिती कर वसुली व दाखलपूर्व प्रकरणे, बि.एस.एन.एल. कंपनी प्रकरणे, एम.एस.ई.डी.सी.एल. कंपनी ईत्यादी प्रकरणे ठेवण्यात आली होती. त्या करीता जिल्हयात एकुण 30 पॅनल तयार करण्यात आले होते.

शनिवार 9 मे रोजी झालेल्या लोक न्यायालयात नांदेड जिल्ह्यातील न्यायालयातील प्रलंबीत एकुण 11 हजार 704 प्रकरणे ठेवण्यात आली होती. त्यापैकी 719 प्रकरणे निकाली व जवळपास 5 कोटी 33 लाख 88 हजार 823 रुपयांचे तडजोड मुल्य होते. मालमत्ता थकबाकी व पाणीपट्टी तसेच दाखलपुर्व दावे 961 प्रकरणे निकाली निघाली त्याचे 2 कोटी 44 लाख 6 हजार 497 रुपयांचे तडजोड मुल्य होते. असे एकूण 1680 प्रकरणे निकाली निघाली आणि तडजोड मुल्य 7 कोटी 68 लाख 49 हजार 320 रूपये एवढे आहे. विषेष म्हणजे 30 लाख रूपयेचे दिवाणी प्रकरण या राष्ट्रीय लोकअदालतीमध्ये निकाली निघाले. जिल्हा विधी सेवा प्राधिकरणाचे सचिव शरद जी. देशपांडे यांनी राष्ट्रीय लोकअदालतीसाठी सहभागी झालेल्या सर्व पक्षकार, न्यायाधीश वर्ग, कर्मचारी वर्ग त्या सर्वांचे मनःपुर्वक आभार मानले.

# ३६व्या ब्रम्होत्सवाचे १८ ते २५ मे दरम्यान कार्यक्रमाचे आयोजन

नवीन नांदेड : (स. गांवकरी)

सिडको येथील भगवान बालाजीचा 36 व्या ब्रम्होत्सवाचे आयोजन दि18 ते 25 मे दरम्यान करण्यात आले असून यात होमहवन विधी व श्रीमद भागवत पारायण भागवताचार्य हभ प.कलिंदिताई पंढरपूरकर व हभप अशोक महाराज पुयड आळंदिकर यांच्या मधुर वाणीतून दुपारी 1ते 4 दरम्यान होणार आहे. दरवर्षीप्रमाणे या ही वर्षी सिडको येथील भगवान बालाजी मंदिरात 36व्या वार्षिक ब्रम्होत्सव आयोजित करण्यात आला आहे दि21ते25 मे दरम्यान आचार्य पंडित सतीश गुरू पोतदार व मंदिर पुजारी दिव्यांशु महाराज यांच्या आचार्य तत्वाने सकाळी अभिषेक होम हवन दुपारी1ते 4 वाजेपर्यंत भागवताचार्य हभप कलिंदिताई पंढरपूरकर व हभप अशोक महाराज पुयड आळंदिकर यांच्या मधुर वाणीतून भागवत कथा दि24 मे रोजी सायंकाळी 7 वाजता श्री भगवान बालाजी व लक्ष्मी पद्मावती उत्सव मूर्तीची भव्य मिरवणूक मंगलगिरी वाहनातून मुख्य रस्ताने डॉ रायेवर यांचा दवाखाना शिवमंदिर संभाजी चौक मार्गे मंदिराकडे येणार आहे मिरवणुकीत सोबत भजनी मंडळ महिला पुरुष सोबत राहणार असून रात्री 9 वाजता कल्याण उत्सव व श्री भगवान बालाजी लक्ष्मी पद्मावती विवाह सोहळा पार पडणार आहे दि 25 मे रोजीसकाळी महाभिषेक आरती तीर्थ प्रसाद होम हवन पूर्णाहुती ब्राम्हण सन्मान महाआशिर्वाद सकाळी11 ते 1,30 काल्याचे कीर्तनह भ प अशोक महाराज पुयड आळंदिकर यांचे काल्याचे कीर्तन व महाप्रसादाचे आयोजन करण्यात आले आहे, या महोत्सवात नागरिक व भक्तांनी सहभागी होण्याचे आवाहान सर्व उत्सव समितीच्या वतीने करण्यात आले आहे.

# पाणी टंचाई निवारणासाठी इसापूर धरणातून पाण्याचा विसर्ग

नांदेड जिल्हा : (स. गांवकरी)

नांदेड व यवतमाळ जिल्ह्यातील पाणी टंचाईग्रस्त गावांना दिलासा देण्यासाठी जिल्हाधिकारी राहुल कर्डिले यांच्या निर्देशानुसार इसापूर धरण प्रकल्पातून पाणी सोडण्यात आले आहे. सर्व संबंधित गावातील ग्रामस्थांनी पाण्याचा वापर जपून व नियोजनपूर्वक करावा, असे आवाहन जलसंपदा विभागाने केले आहे. नागरिकांनी कालवा, नाल्यातून बेकायदेशिर पाणी उपसा (पंपीग) करु नये व पाण्याची नासाडी टाळावी जेणेकरुन सर्व गावांना पाणी मिळणे सोयीस्कर होईल. पाणी टंचाई निवारणासाठी जलसंपदा विभाग कटिबध्द असून उर्वरित पाण्याचे नियोजन वेळापत्रकाप्रमाणे केले जाईल, अशी माहिती उर्ध्व पैनगंगा प्रकल्प विभाग क्र. 1 चे कार्यकारी अभियंता यांनी दिली आहे. 30 मार्च 2026 च्या आदेशान्वये नांदेड जिल्ह्यासाठी 3.00 दलघमी पाणी सोडण्यात आले आहे. तर यवतमाळ जिल्ह्यासाठी 4.00 दलघमी व 1 मे 2026 च्या आदेशान्वये 5.00 दलघमी पाणी सोडण्यात आले आहे. इसापूर धरणातून थेट पाणी सोडण्यास्तव विमोचक नसल्याकारणाने कालवा प्रणालीमधून नियमित कालवा आवर्तनाचे वेळापत्रकाप्रमाणे संयुक्तीक होईल अशा विमोचकाद्वारे 5 एप्रिल 2026 रोजी पासून पाण्याचा विसर्ग सुरु करण्यात आला आहे. 11 मे 2026 अखेरपर्यंत एकूण मागणी 12.00 दलघमी पैकी 6.81 दलघमी इतके पाणी नाल्याद्वारे प्रवाहित करण्यात आले आहे.

नांदेड जिल्हा- गुरफळी, बाभळी, बनचिंचोली, वाटेगाव, हरडफ, धोत्रा, कामारी, पिंपरी, डोल्हारी, सिरपल्ली, सिल्लोड, एकंबा, कौठा, बोरगडी, धानोरा, वारंगटाकळी, मंगरुळ, साप्ती, मनुला (बु), म्हाटाळा, पेवा दिघी, घारापुर, पळसपूर, डोल्हारी व विरसणी या गावांचा समावेश आहे.

यवतमाळ जिल्हा- टाकळी, राजापूरवाडी, चालगणी, साखरा, खरुस, लोहरा, कारखेड, देवसरी,दिघडी, ऊंचवडद, सिंदगी, गांजेगाव, सावळेश्वर, भोजनगर, बिटरगाव, रतननाईकनगर, बोडका, पिंपळगाव, पेंदा, लिंगी, मुरली, मुळावा, हातला, दिवट, पिंपरी, पळशी, नागापूर, बारा चातारी, बोरी, कोप्रा, मानकेश्वर व सिंदगी या गावांचा समावेश आहे,

# 'घबाडकुंड'... रहस्य, थरार आणि भीतीचा अनोखा खेळ

**मराठी मनोरंजन विश्वात लवकरच एक उत्कंठावर्धक कलाकृती**

नाशिक : (स. गांवकरी)

नावातच गूढता दडलेली ही कलाकृती थरार, रहस्य आणि भीतीचा अनोखा खेळ घेऊन येत आहे. 'घबाडकुंड' ही कथा एका अशा ठिकाणाभोवती फिरते, जिथे भूतकाळातील काही न सुटलेली रहस्ये आजही जिवंत आहेत. या रहस्याशी संबंधित असलेल्या घटनांमुळे स्थानिकांमध्ये भीती आणि कुतूहल यांचे अनोखे मिश्रण निर्माण झाले आहे. मात्र, या रहस्याचा शोध घेण्यासाठी पुढे सरसावणाऱ्या काही व्यक्तिरेखा प्रेक्षकांना अनपेक्षित प्रवासावर घेऊन जातात. 'घबाडकुंड' चित्रपटाच्या निमित्ताने मराठीत पहिल्यांदाच साकारत असलेल्या 'युनिव्हर्स'मुळे हा चित्रपट जबरदस्त सिनेमॅटिक अनुभव ठरणार आहे. एक भव्य आणि रहस्यमय 'युनिव्हर्स' मोठ्या पडद्यावर साकारण्याचा हा धाडसी प्रयत्न दिग्दर्शक प्रितम एस. के. पाटील यांनी केला आहे. या अभिनव संकल्पनेला 'आयकॉन दी स्टाईल' संस्थेचे निर्माते डॉ. रसिक कदम यांची भक्कम साथ लाभली आहे. 'घबाडकुंड' हा भव्य



चित्रपट येत्या १९ जूनला प्रेक्षकांच्या मनोरंजनासाठी सज्ज होत आहे.

आयुष्यात अनपेक्षित घटनांनी काहींच्या स्वप्नांना पंख फुटतात, पण त्याचवेळी पडद्यामागे सुरू असतो संशय आणि संकटांचा भयानक खेळ. भीती आणि अनिश्चिततेच्या छायेत घडणाऱ्या अकल्पित घटनांमुळे कथानक प्रत्येक टप्प्यावर नवे प्रश्न उभे करते. सत्याच्या शोधात निघालेल्यांना कोणत्या गोष्टीला सामोरे जावे लागते? आणि शेवटी नशिब जिंकतं की माणूस? याची उत्कंठा वाढविणारा 'घबाडकुंड' हा भव्य चित्रपट येत्या १९ जूनला प्रेक्षकांच्या मनोरंजनासाठी सज्ज होत आहे. शशांक शेंडे, संदीप पाठक, देवदत्त नागे, कुशल बद्रिके, प्राजक्ता हनमघर, स्मिता पायगुडे-अंजुटे, वैष्णवी कल्याणकर, रॉकी देशमुख, आरोही भोईर, योगेश प्रकाश तनपुरे, साहिल अनलदेवर आदि कलाकारांची दमदार फौज 'घबाडकुंड' चित्रपटात आहे.

दिग्दर्शकाने कथानकाची मांडणी अत्यंत प्रभावी पद्धतीने करत प्रेक्षकांना शेवटपर्यंत खिळवून ठेवण्याचा प्रयत्न केला आहे. उत्कृष्ट छायांकन, पार्श्वसंगीत आणि दमदार अभिनय यामुळे 'घबाडकुंड'चा अनुभव अधिक रोमांचक होणार आहे. थरार आणि रहस्य आवडणाऱ्या प्रेक्षकांसाठी 'घबाडकुंड' ही एक पर्वणी ठरणार आहे. हा चित्रपट मराठीसह दाक्षिणात्य भाषांमध्ये सुद्धा चित्रपट प्रदर्शित होणार आहे.

चित्रपटाचे लेखन संजय नवगिरे, अक्षय धरमपाल यांचे आहे. गीतकार नयूम पठाण आहेत. कलादिग्दर्शन योगेश इंगळे, छायांकन योगेश कोळी तर संकलन सौमित्र धाराशिवकर यांचे आहे. साऊथचे प्रसिद्ध फाईट मास्टर कार्तिक यांनी या चित्रपटासाठी बॅकग्राउंड म्युझिकची जबाबदारी अभिनय जगताप यांनी सांभाळली आहे. रि-रेकॉर्डिंग मिक्सर सुजित शिनगारे व साउंड डिझाइन मानव श्रोत्रिय (एम पी एस सी) यांचे आहे. मॅनेजर विष्णु घोरपडे आहेत.

# येडगाव परिसरातील केबल चोरीप्रकरणी शेतकरी हतबल

खोडद : (स. गांवकरी)

येडगाव धरण जलाशयात असलेल्या इंदिरानगर परिसरातील 40 कृषी विज पंपांच्या सुमारे आठ हजार फूट लांबीच्या केबल अज्ञात चोरट्यांनी आज पहाटेच्या सुमारास चोरून नेल्या. शेती पिकांना सिंचन करण्यासाठी कृषी पंपांना जोडणी करण्यासाठी नवीन केबल खरेदी कराव्या लागणार आहेत. यामुळे शेतकऱ्यांना एकूण सुमारे दहा लाख रुपयांचा आर्थिक भुर्दंड सहन करावा लागणार आहे. 8 फेब्रुवारी 2026 रोजी येथील खंडोबा माळ परिसरातील 40 कृषी पंपांच्या केबल चोरीला गेल्या होत्या. या चोरीचा तपास अद्याप लागला नसतानाच पुन्हा या भागात चोरीची दुसरी घटना झाली आहे.सातत्याने



होत असलेल्या केबल चोरीमुळे शेतकरी हतबल झाले आहेत.

दरम्यान या प्रकरणी शेतकऱ्यांनी आज खासदार डॉ.अमोल कोल्हे, माजी आमदार अतुल बेनके, सहाय्यक पोलीस निरीक्षक प्रवीण संपांगे यांची भेट घेऊन या दुष्टचक्रातून आमची सुटका करा. अशी विनवणी केली आहे. येडगाव ग्रामपंचायत हद्दीतील इंदिरानगर, कैलासनगर, हांडे मळा, गणेशनगर, खंडोबाचे माळ, दोन देवळे परिसरात शेतकऱ्यांचे कृषी उपसा जलसिंचनेचे सुमारे चारशे कृषी पंप येडगाव धरण जलाशयात आहेत. सन 2022 पासून याच भागातील केबल उन्हाळ्यात धरण जलाशयाची पाणीपातळी कमी झाल्यानंतर चोरीला जात आहेत.

येडगाव धरणाची पाणी पातळी खालावल्याने केबल उघड्या पडल्या आहेत. या संधीचा फायदा घेत अज्ञात चोरट्यांनी आज पहाटेच्या सुमारास इंदिरानगर परिसरातील शिवाजी शिंदे,शिवाजी नेहरकर, अरुण भिसे,प्रकाश नेहरकर, दत्तात्रय भिसे,शरद नेहरकर, शरद काशीद, वैभव भिसे,गणेश भिसे,तुषार गावडे, दिलीप भोर,कैलास काशीद आदि शेतकऱ्यांच्या सुमारे 40 कृषी विज पंपांच्या सुमारे आठ हजार फूट लांबीच्या केबल चोरून नेल्या आहेत.एका कृषी पंपाला सुमारे दीडशे ते दोनशे मीटर लांबीची सुमारे 13 हजार रुपये किमतीची तांबे धातु असलेली केबल होती. यापूर्वीचा अनुभव पाहता केबल चोरीला जाऊ नये म्हणून शेतकऱ्यांनी केबल भूमिगत गाडल्या होत्या. तरीपण चोरट्यांनी डाव साधला.

या बाबत माजी सरपंच गुलाबराव नेहरकर, प्रकाश नेहरकर, शिवाजी नेहरकर म्हणाले टोमॅटो,कांदा व इतर भाजीपाला पिकांना बाजार नाहीत. तापमान वाढीमुळे पिकांना रोज सिंचन करावे लागत आहेत. शेतकरी आर्थिक विवंचनेत असताना केबल चोरीचा भुर्दंड सहन करावा लागत आहे.मात्र केबल चोरांचा कायमस्वरूपी छडा लावण्यात पोलिसांना यश येत नाही. केबल मधील तांब्याची तार काढून चोरटे भंगार व्यवसायिकांना विक्री करतात.दरम्यान आज घटनास्थळी भेट देऊन नारायणगाव पोलिसांनी पाहणी केली. नारायणगावचे सहायक पोलीस निरीक्षक प्रवीण संपांगे यांनी घटनास्थळी भेट देऊन हा परिसर निर्जन आहे. याचा फायदा चोरटे घेत आहेत.

परिसरात वारंवार केबल चोरी होत आहेत. यापूर्वी कांदळी परिसरातील केबल चोरट्यांना अटक करण्यात आली आहे. ग्रामपंचायतिने परिसरात सीसीटीव्ही कॅमेरे बसवल्यास चोरट्यांचा तपास करणे सोपे होईल. याबाबत संबंधितांना सूचना करण्यात आल्या आहेत.

हे पत्रक मालक, मुद्रक, प्रकाशक, संपादक डॉ. विश्वासराव आनंदराव आरोटे यांनी सोनेरी छत्रपती प्रिंटर्स, भिंगारे गोडावूनजवळ, अकोले, ता. अकोले, जि. अहमदनगर – ४२२६०१ (महाराष्ट्र) येथे छापून दैनिक समर्थ गांवकरी कार्यालय, भिंगारे गोडावूनजवळ, अकोले, ता. अकोले, जि. अहमदनगर – ४२२६०१ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. This newspaper is printed by owner, printer, publisher, editor Vishwasrao Anandrao Arote at Soneri Chhatrapati Printers, Near Bhingare Godown, Akole, Tq. Akole, Dist. Ahmednagar - 422601.
पुणे निवासी संपादक : प्रतिक गंगणे, मुंबई विभागीय संपादक : दशरथ चव्हाण, व्यवस्थापक : संजय फुलसुंदर कार्यकारी संपादक : नवनाथ जाधव, ॲड. रचना भालके (हायकोर्ट), ठाणे
पुणे विभागीय कार्यालय : फ्लॅट नं. ४०६, व्यंकटेश विश्व, अभिरूची परिसर समोर, पारे कंपनी रोड, नऱ्हे, पुणे – ४११०४१ / ठाणे विभागीय कार्यालय : A-1, भाग्यश्री छाया, बेसमेंट, आवाज रेडिओ जवळ, डेअरी कॉटेज, इदुलजी रोड, चाराई, ठाणे (वे.)

## थोडक्यात पण महत्वाचे



### शहीद तुकाराम ओंबळे लॉन टेनीस कोर्टचे महापौरांच्या हस्ते उद्घाटन

ठाणे (स. गांवकरी) : ठाणे महानगरपालिकेच्या वतीने शहीद तुकाराम ओंबळे बॅडमिंटन हॉल येथील नुतनीकरण करण्यात आलेल्या लॉन टेनिस कोर्टचे उद्घाटन आज महापौर शर्मिला पिंपळोलकर यांच्या हस्ते करण्यात आले. या ठिकाणी अनेक अधिकारी लोकप्रतिनिधी हे टेनिस खेळण्यासाठी येत असतात, त्यांच्या मागणीनुसार उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी दिलेल्या निधीतून या लॉनचे नुतनीकरण करण्यात आले असून याचा लाभ जास्तीत अधिकारी, लोकप्रतिनिधी यांनी घ्यावा असे आवाहन महापौर शर्मिला पिंपळोलकर यांनी यावेळी केले. या उद्घाटनास उपमहापौर कृष्णा पाटील, सभागृह नेते हणमंत जगदाळे, विरोधी पक्ष नेते अशरफ ऊ. शानू पठाण, अतिरिक्त आयुक्त 1 संदीप माळवी, उपायुक्त क्रीडा मीनल पालांडे, स्थानिक नगरसेवक वैभव कदम, माजी नगरसेवक शरद कणसे, कार्यकारी अभियंता शैलेंद्र चारी, संदीप गायकवाड, ऋषिकेश माने आदी उपस्थित होते. विविध आस्थापनांमध्ये काम करणाऱ्या अधिका-यांना विरंगुळा मिळावा यासाठी महापालिकेने हे लॉन टेनीस कोर्ट तयार केले होते. या ठिकाणी अनेक अधिकारी, माजी अधिकारी तसेच लोकप्रतिनिधींनी सदस्यत्व घेतले असून ते नियमित खेळासाठी येत असतात. हा लॉन टेनिस कोर्ट अद्ययावत करण्याची मागणी येथे येणाऱ्या अधिकाऱ्यांनी केली होती. त्यानुसार अद्ययावत पध्दतीने हा टेनिस कोर्ट तयार करण्यात आला असून त्याचे उद्घाटन आज झाले असल्याचे महापौरांनी जाहीर केले. शहीद तुकाराम ओंबळे बॅडमिंटन कोर्ट येथे नियमितपणे विविध वयोगटांसाठी प्रशिक्षण बॅचेसही चालविण्यात येणार आहेत. क्रीडा संस्कृतीला चालना देण्यासाठी तसेच येथे सदस्यत्व घेतलेल्या खेळाडूंना दर्जेदार क्रीडा सुविधा उपलब्ध करून देण्याच्या दृष्टीने या लॉन टेनिसचे नुतनीकरण करण्यात आले आहे.

### जिल्ह्यात कायमस्वरूपी कृती टीम स्थापनेचे आदेश

भिवंडी (स. गांवकरी) : अप्पर आयुक्त (महसूल) तथा पदसिद्ध विशेष कार्य अधिकारी, मुख्यमंत्री सचिवालय कक्ष कोकण विभाग यांचेकडील आदेशाने जिल्हाधिकारी, ठाणे यांनी वर्षाचे ३६५ दिवस कायमस्वरूपी जलद कृती टीम स्थापन करण्याबाबतचे आदेश महापालिका आयुक्त, ठाणे, नवी मुंबई, मीरा-भाईंदर, कल्याण डोंबिवली, भिवंडी व उल्हासनगर, मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद ठाणे, पोलीस आयुक्त ठाणे, कार्यकारी अभियंता, पीडब्ल्यूडी, सर्व तहसीलदार व सर्व उपविभागीय अधिकारी, सर्व गटविकास अधिकारी, पंचायत समिती व्यवस्थापक, टोरेंट पॉवर लिमिटेड, उपनियमक, नागरी संरक्षण दल, ठाणे यांना आदेश निर्गमित केले आहेत. राष्ट्रीय मानव हक्क मंचचे अध्यक्ष शरद धुमाळ यांनी महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांच्याकडे ठाणे जिल्ह्यातील सर्व तालुक्यातील शहरी तथा ग्रामीण भागातील आगी, पावसाळी आपत्ती, नैसर्गिक व मानवनिर्मिती आपत्तीच्या पार्श्वभूमीवर आपत्ती व्यवस्थापन अधिनियम २०४५ नुसार वर्षाचे ३६५ दिवस कायमस्वरूपी जलद कृती टीम स्थापन करण्याबाबत निवेदन सादर केले होते. त्यामुळे अध्यक्षांचे सर्वत्र अभिनंदन होत आहे.

### सुधारित पेन्शन योजना दिशाभूल करणारी : पडवळ

खोडद (स. गांवकरी) : महाराष्ट्र राज्य सरकारने ६ मे २०२६ रोजी राष्ट्रीय निवृत्तीवेतन प्रणाली (NPS) मध्ये सुधारणा करून नवीन सुधारित पेन्शन योजना (Revised NPS/UPS) जाहीर केली आहे. या योजनेवर कर्मचारी संघटनांकडून संमिश्र प्रतिक्रिया येत असून, काहींनी याला "फसवणूक" तर काहींनी "एक पाऊल पुढे" म्हटले आहे. संघटनेचे अध्यक्ष राहुल पडवळ यांनी शासनावर गंभीर आरोप करत या निर्णयाचा निषेध नोंदविला आहे. ज्या कर्मचाऱ्यांनी २० वर्षे किंवा त्याहून अधिक सलग सेवा पूर्ण केली आहे, त्यांना सेवानिवृत्तीच्या वेळेस मिळणाऱ्या शेवटच्या मूळ वेतनाच्या ५० टक्के रक्कम पेन्शन म्हणून मिळेल.या पेन्शनवर महागाई भत्ता (DA) लागू राहील. किमान१० ते २० वर्षांची सेवा असल्यास किमान ७,५०० रु.पेन्शनची हमी असेल. निवृत्तीनंतर ६० टक्के हिस्सा शासनाकडे जमा करण्याची अट आहे. तसेच गरजेपुटी स्वतःच्या खात्यातून 25% रक्कम काढलेल्या कर्मचाऱ्यांना ती रक्कम दहा टक्के व्याजासह परत भरण्याची अटही कठोर असल्याचे सांगण्यात आले. यावेळी पडवळ यांनी सांगितले की, दरमहा पगारातून दहा टक्के कपात होत असताना अनेक कर्मचारी निवृत्तीपूर्वीच निधन पावतात. अशावेळी त्यांचा निधी सुरक्षित राहण्याऐवजी शासन तो काढून घेण्याची भाषा करत आहे त्यामुळे जुन्या पेन्शन योजनेचा अधिकार कर्मचाऱ्यांनाच मिळायला हवा असे स्पष्ट केले.

### गुन्हे शाखेचा सन्मान

खोडद (स. गांवकरी) : मंचर परिसरातील थोरांदळे पाईनमळा येथे 31 मार्च 2026 रोजी दामोदर जयराम मिंडे (वय 62) या वयस्कर व्यक्तीचा खून करून सोन्याची अंगठी मोबाईल व रोख रक्कम असा सुमारे 29 हजार रुपयांचा ऐवज चोरट्यांनी लुटला होता. या गंभीर गुन्ह्याचा तपास करत असताना पोलिसांना त्याचा शोध लागत नव्हता. मात्र स्थानिक गुन्हे शाखेच्या पथकाकडून 100 हून अधिक सीसीटीव्ही फुटेज तपासण्यात आले. त्यातून संशयित आरोपींची माहिती मिळवत 5 एप्रिल 2026 रोजी पुणेवाडी परिसरात सापळा रचून कबीर उंबऱ्या काळे (वय 24,सध्या रा. पुणेवाडी,ता.पारनेर, जि.अहिल्यानगर आणि एका विधी संघर्षीत बालकाला पाठलाग करून ताब्यात घेतले. या आरोपींकडून गुन्ह्यात वापरलेली दुचाकी जप्त केली. या तपासा दरम्यान आरोपींकडून ओतूर,घोडेगाव,मंचर आणि दिंडोरी पोलीस ठाण्याच्या हद्दीतील आणखी चार जबरी चोरीचे गुन्हेही उघडकीस आले. या गुन्ह्यांचा शोध घेण्यास स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक प्रमोद क्षीरसागर,महादेव शेलार यांच्यासह अभिजीत सावंत, दीपक साबळे,संदीप वारे, अक्षय नवले,राजू मोमीन,अतुल डेरे हनुमंत ढोबळे, योगेश रोडे आणि अजित पवार यांनी शोध लावल्यामुळे त्यांचा सत्कार करण्यात आला.

### कौटुंबिक वादातून पतीने केली पत्नी व मुलाला मारहाण

खोडद (स. गांवकरी) : जुन्नर तालुक्यातील बोरी बुद्रुक येथे राहणाऱ्या कोरडे कुटुंबातील स्वाती मिलिंद कोरडे व मिलिंद कोरडे या 8 मे रोजी लग्नासाठी आळेफाटा येथे गेले होत्या. त्यावेळी त्यांचे पती मिलिंद दत्तात्रय कोरडे यांनी त्यांना दारूच्या नशेत चाळकवाडी येथे गाठून शिवीगाळ केली. त्यानंतर सायंकाळी स्वाती कोरडे आणि त्यांचा मुलगा सुमित हे घरी गेले असता तिथे पुन्हा मिलिंद कोरडे व स्वाती कोरडे यांच्यात वाद झाला.पती मिलिंद कोरडे यांनी हातातील कुऱ्हाडीच्या लाकडी दांड्यांनी पत्नी स्वाती हिला मारहाण केली. तसेच अथर्व योगेश याने पीव्हीसी पाईपने पाठीवर तर सासू विमल यांनी लाकडी काठीने मारहाण केली. याप्रकरणी फिर्यादी स्वाती कोरडे यांनी पती मिलिंद कोरडे,अथर्व कोरडे,सासू विमल कोरडे आणि आयुष कोरडे यांच्यावर आळेफाटा पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला.

# साठवण तलावातील गौण खनिज घोटाळा तापला

## फास्टट्रॅक चौकशीची बाजीराव दराडे यांची मागणी!

अकोले : (स. गांवकरी)

अकोले तालुक्यातील पिंपळदरावाडी येथील साठवण तलावाच्या कामामधून निघालेल्या गौण खनिजाच्या कथित बेकायदेशीर उत्खनन व विक्रीप्रकरणी आता महसूल प्रशासनाने गंभीर दखल घेतली असून संबंधितांवर फौजदारी कारवाईचे संकेत मिळत आहेत. या प्रकरणाची चौकशी फास्टट्रॅकवर करून दोषींवर कठोर कारवाई करावी, अशी मागणी इंजिनिअर बाजीराव शंकरराव दराडे यांनी केली आहे. तहसीलदार तथा कार्यकारी दंडाधिकारी अकोले कार्यालयाकडून दिनांक ५ मे २०२६ रोजी मृद व जलसंधारण उपविभाग संगमनेर यांना पाठविण्यात आलेल्या अधिकृत पत्रामुळे या प्रकरणाला अधिक गांभीर्य प्राप्त झाले आहे. बाजीराव दराडे यांनी महसूल राज्यमंत्र्यांकडे ९ फेब्रुवारी २०२६ रोजी केलेल्या तक्रारीनंतर महसूल प्रशासनाने



चौकशीची प्रक्रिया सुरू केली.

यानंतर मंडळ अधिकारी खिरविरे यांनी १ मे २०२६ रोजी घटनास्थळी पंचनामा करून सविस्तर अहवाल सादर केला. या अहवालानुसार पिंपळदरावाडी येथील साठवण तलावात अंदाजे ६० ते ६५ फूट खोली व १८० ते २०० फूट रुंदीचे मोठ्या प्रमाणावर उत्खनन करण्यात आलेले आढळले. मात्र उत्खननातून निघालेल्या माती, दगड व मुरूमाचा कोणताही साठा घटनास्थळी दिसून आला नसल्याने संशय अधिक गडद झाला आहे.

चौकशी अहवालात गौण खनिजाची शासन परवानगीने विक्री झाल्याची किंवा त्याची अधिकृत नोंद असल्याची कोणतीही माहिती उपलब्ध नसल्याचे स्पष्ट करण्यात आले आहे. तसेच गौण खनिज वाहतुकीसाठी महसूल विभागाची कोणतीही परवानगी घेण्यात आलेली नसल्याचेही नमूद करण्यात आले आहे. त्यामुळे संबंधित ठेकेदाराने नियमबाह्य पद्धतीने गौण खनिजाची परस्पर विक्री केल्याचा आरोप अधिक बळावला आहे.

जलसंधारण विभागाच्या अंदाजपत्रकानुसार या कामात सुमारे २५ हजार ते ३० हजार ब्रासपर्यंत उत्खनन अपेक्षित असल्याचे सांगितले जात आहे. एवढ्या मोठ्या प्रमाणातील गौण खनिजासाठी स्वामित्व धन, रॉयल्टी व महसूल विभागाची परवानगी आवश्यक असतानाही नियमांचे पालन झाले नसल्याचा आरोप नागरिकांनी केला आहे.

या प्रकरणात शासनाचे दीड कोटी ते अडीच कोटी रुपयांपर्यंत महसुली नुकसान झाल्याचा संशय व्यक्त केला जात आहे. सर्वसामान्य नागरिकांना अल्प प्रमाणातील मुरूम वाहतुकीवर लाखो रुपयांचा दंड भरावा लागतो, मात्र एवढ्या मोठ्या प्रमाणातील गौण खनिज विक्रीकडे प्रशासनाने दुर्लक्ष का केले, असा सवाल उपस्थित होत आहे.

दरम्यान, या प्रकरणामागे कोणाचा राजकीय किंवा प्रशासकीय वरदहस्त होता का, याचाही शोध घेण्याची मागणी होत आहे. संबंधित ठेकेदारावर दंडात्मक कारवाई करून शासनाचे नुकसान वसूल करण्यात यावे, तसेच फौजदारी गुन्हा दाखल करून पारदर्शक चौकशी करावी, अशी मागणी स्थानिक नागरिकांनी केली आहे. चौकशीस विलंब झाल्यास राजकीय दबाव टाकून प्रकरण दडपण्याचा प्रयत्न होऊ शकतो, अशी भीती व्यक्त करत बाजीराव दराडे यांनी या संपूर्ण प्रकरणाची फास्टट्रॅक पद्धतीने चौकशी करण्याची जोरदार मागणी केली आहे.

## नगरसेवकांच्या अपात्रतेच्या मुद्द्यावरून 'बिचकुले' अस्त्र.

ठाणे : (स. गांवकरी)

ठाणे महानगरपालिकेच्या दिवा परिसरातील शिंदे गटाच्या नऊ नगरसेवकांविरोधात न्यायालयात याचिका दाखल झाल्यानंतर दिव्यातील राजकीय वातावरण चांगलेच तापले आहे. ठाकरे गटाचे कल्याण उप जिल्हाप्रमुख ॲड. रोहिदास मुंडे यांनी या नगरसेवकांवर अपात्रतेची टांगती तलवार असल्याचे वक्तव्य केल्यानंतर आता शिंदे गटाचे नगरसेवक ॲड. आदेश भगत यांनी सोशल मीडियाच्या माध्यमातून मुंडेंवर जोरदार पलटवार केला आहे. 'मुंगेरीलाल के हसीन सपने' आणि 'बिचकुले' उपमा देत नगरसेवक ॲड. आदेश भगत यांनी आपल्या सोशल मीडिया अकाउंटवरून एक उपरोधिक फोटो शेअर केला आहे. या फोटोवर "मुंगेरीलाल के हसीन सपने" असे लिहीत मुंडे यांना स्वप्नवत जगात वावरणारा नेता असल्याचे दर्शवले आहे. केवळ फोटोच नव्हे, तर आपल्या पोस्टमध्ये अत्यंत जहाल शब्दांत भगत यांनी मुंडे यांची खिल्ली उडवली आहे. "जनतेने लाथाडले, अनेक पक्षांनी हाकलले, दिवा शहराचे बिचकुले, खोट्या स्वप्नात अडकले" अशा शब्दांत भगत यांनी मुंडे यांच्या राजकीय प्रवासावर आणि त्यांच्या दाव्यांवर बोचरी टीका केली आहे. काही दिवसांपूर्वी ॲड. रोहिदास मुंडे यांनी पत्रकार परिषद घेऊन माहिती दिली होती की दिव्यातील शिंदे गटाच्या नऊ नगरसेवकांनी निवडणूक शपथपत्रात मालमत्ता आणि इतर माहिती लपवली आहे. याप्रकरणी न्यायालयात 'इलेक्शन पिटीशन' दाखल करण्यात आली असून हे नगरसेवक अपात्र ठरतील, असा दावा त्यांनी केला होता. या दाव्यामुळे शिंदे गोटात खळबळ माजली होती. प्रसंगी आज आदेश भगत यांच्या या पोस्टमुळे दिव्यात आता 'ठाकरे गट विरुद्ध शिंदे गट' असा थेट सामना रंगला आहे.

## डांग गुजरात : शाळा बांधकामातही गैरव्यवहार?

### निकृष्ट दर्जाच्या साहित्य वापराचा आरोप; जबाबदार कोण — प्रशासन की ठेकेदार?

डांग गुजरात: (स. गांवकरी)

डांग जिल्ह्यातील आहवा तालुक्यातील मालेगाव येथे सर्व शिक्षा अभियानांतर्गत सुरू असलेल्या प्राथमिक शाळेच्या नवीन इमारतीच्या बांधकामात मोठ्या प्रमाणावर गैरव्यवहार आणि निकृष्ट दर्जाच्या साहित्याचा वापर होत असल्याचा गंभीर आरोप समोर आला आहे. या प्रकारामुळे ग्रामस्थांमध्ये तीव्र संताप व्यक्त केला जात आहे. स्थानिकांच्या म्हणण्यानुसार, ठेकेदाराने सरकारी निकष धाब्यावर बसवून केवळ नफेखोरीच्या उद्देशाने अत्यंत निकृष्ट दर्जाचे बांधकाम सुरू केले आहे. यामुळे भविष्यात या शाळेत शिक्षण घेणाऱ्या निष्पाप विद्यार्थ्यांच्या जीवाला धोका निर्माण होऊ शकतो, अशी भीती व्यक्त केली जात आहे. मिळालेल्या माहितीनुसार, मालेगाव प्राथमिक शाळेच्या स्लॅब आणि खांबांच्या बांधकामात मोठ्या प्रमाणावर हलगर्जीपणा करण्यात




येत आहे. ग्रामस्थांनी प्रत्यक्ष पाहणीदरम्यान सांगितले की, सिमेंट काँक्रीटच्या कामात नियमानुसार दर्जेदार वाळू वापरण्याऐवजी मोठ्या प्रमाणावर ग्रीट (दगडाच्या खडीचा भुगा) वापरला जात आहे. तसेच बांधकामासाठी वापरण्यात येणारे सिमेंटही निकृष्ट दर्जाचे असल्याचे दिसून आले आहे.

बांधकाम मजबूत राहण्यासाठी आवश्यक असलेले नियमित पाण्याचे क्युरिंग करणे बंधनकारक असतानाही ठेकेदाराकडून या प्रक्रियेत गंभीर दुर्लक्ष केले जात असल्याचा आरोप ग्रामस्थांनी केला आहे. घटनास्थळी खांबांना केवळ रिकामे गोणपाट बांधून औपचारिकता पूर्ण करण्यात आल्याचे दिसून आले. गोणपाट कोरडे असल्याने ग्रामस्थांनी हा प्रकार केवळ दिखावा असल्याचे म्हटले आहे. स्थानिकांच्या म्हणण्यानुसार, पुरेशा पाण्याअभावी सिमेंट योग्य प्रकारे सेट होत नसल्याने बांधकामात आतापासूनच कमकुवतपणा दिसून येत आहे. ग्रामस्थांनी संबंधित वरिष्ठ अधिकाऱ्यांनी तात्काळ घटनास्थळी भेट देऊन संपूर्ण बांधकामाची तांत्रिक चौकशी करावी, तसेच दोषी ठेकेदाराविरोधात कठोर कारवाई करून शाळेची इमारत सुरक्षित आणि मजबूत पद्धतीने उभारावी, अशी मागणी केली आहे.

मालेगाव ग्रामस्थांनी इशारा दिला आहे की, विद्यार्थ्यांच्या भविष्यासोबत कोणताही खेळ सहन केला जाणार नाही. योग्य कारवाई न झाल्यास आगामी काळात तीव्र आंदोलन छेडले जाईल.

## बितनगडावर महाराणा प्रताप जयंती उत्साहात साजरी



एकदरे : (स. गांवकरी)

वीर शिरोमणी महाराणा प्रताप यांच्या ४८६ व्या जयंतीनिमित्त कळसूबाई मित्र मंडळ,घोटी यांच्या वतीने अहिल्यानगर व नाशिक जिल्ह्याच्या सरहद्दीवरील ऐतिहासिक बितनगडावर उत्साहात अभिवादन कार्यक्रम पार पडला.गडकिल्ल्यांचे ऐतिहासिक महत्त्व जपण्यासोबतच तरुण पिढीमध्ये स्वराज्य,शौर्य आणि राष्ट्रभक्तीची प्रेरणा जागविण्याचा संदेश यावेळी देण्यात आला. विविध महाराष्ट्रातील गडकिल्ल्यांवर गेल्या तीन दशकांपासून धार्मिक व ऐतिहासिक उपक्रम राबविणारे कळसूबाई मित्र मंडळ यंदाही महाराणा प्रताप जयंतीनिमित्त बितनगडावर एकत्र आले होते. कळसूबाई शिखर व विश्रामगड यांच्या दरम्यान असलेल्या या गडावर महाराणा प्रताप,छत्रपती शिवाजी महाराज यांच्या प्रतिमांचे पूजन करण्यात आले.यावेळी महाराणा की जय हो','शिवा की जय हो'अशा घोषणांनी परिसर दुमदुमून गेला. महाराणा प्रताप हे त्याग,तपस्या,बलिदान, स्वाभिमान आणि अखंड स्वातंत्र्याचे प्रतीक असल्याचे सांगत त्यांच्या शौर्यगाथेचा गौरव करण्यात आला. तसेच हिंदवी स्वराज्याचे संस्थापक छत्रपती शिवाजी महाराज आणि स्वराज्य रक्षणासाठी छत्रपती संभाजी महाराजांना सहकार्य करणारे दुर्गादास राठोड यांचेही स्मरण करून अभिवादन करण्यात आले. गड-किल्ल्यांचा इतिहास,स्थापत्यकला,प्रशासन,युद्धनीती आणि पराक्रमी राजांच्या शौर्याची माहिती नव्या पिढीपर्यंत पोहोचविण्याच्या उद्देशाने हा उपक्रम राबविण्यात आल्याचे आयोजकांनी सांगितले.

या कार्यक्रमात कळसूबाई मित्र मंडळाचे अध्यक्ष भगीरथ मराडे यांच्यासह अभिजीत कुलकर्णी,संजय शर्मा,डॉ.महेंद्र आडोळे,निलेश पवार,प्रवीण भटाटे, नगमा खलीफा,रेखा भटाटे,मृणाली सातपुते, प्रियांका मराडे,गोकुळ चव्हाण,सुधाकर तांबे,संजय शेवाळे,चेतन जोशी,नामदेव जोशी,नारायण नाठे आणि गोकुळ सूर्यवंशी सहभागी झाले होते.

## अलअमीन उर्दू हायस्कूलचा दहावीचा निकाल शंभर टक्के



नेवासा: (स. गांवकरी)

नेवासा येथे माजी जिल्हा परिषद सदस्य महंमदभाई आतार यांनी स्थापित केलेल्या अलअमीन उर्दू हायस्कूलचा इयत्ता दहावीचा निकाल शंभर टक्के लागला आहे. शंभर टक्के निकालाची अनेक वर्षापासूनची असलेली परंपरा या विद्यालयाने कायम जपली आहे. अलअमीन उर्दू हायस्कूलची विद्यार्थिनी कु.सामीया शोएब शेख ८२.६० टक्के प्रथम,कु.मुबश्शिरा मोहंमद पठाण ७८.४० द्वितीय,कु. मन्तशा इरफान कुरैशी ७५.६० टक्के तृतीय,कु.अमना अमीन शेख ७५ टक्के चतुर्थ,कु. आईशा मोहसीन शेख ७३.८० टक्के पाचवी यांनी विशेष यश संपादन केले. यश संपादन करणाऱ्या विद्यार्थ्यांचे संस्थेचे संस्थापक अध्यक्ष व माजी जिल्हा परिषद सदस्य महंमदभाई आतार,विश्वस्त मौलाना ईबतेहाजोद्दीन काझी,आजमखान पठाण,फारूकभाई आतार,सादिक पटेल,शमीमभाई सय्यद,फारूक रज्याक कुरैशी,फकीर मोहंमद अत्तार,सलीम शेख,मुख्याध्यापक अन्सार पठाण, सर्व शिक्षक वृंदासह शिक्षकेतर कर्मचाऱ्यांनी अभिनंदन केले आहे.

# बनावट कागदपत्रे दाखल करणाऱ्यांवर कारवाई करावी

कळवण : (स. गांवकरी)

आरटीई अंतर्गत प्रवेशासाठी बनावट आधार कार्ड, मतदान कार्ड, नाममात्र भाडे करारनामे करून अर्ज करणाऱ्या लाभार्थ्यांची चौकशी करून गुन्हे दाखल करावे आणि वंचित लाभार्थ्यांना न्याय द्यावा. यासाठी मानूर ग्रामस्थांनी प्रांताधिकारी कश्मिरा संखे यांच्याकडे निवेदनाद्वारे मागणी केली आहे. यामुळे एकच खळबळ उडाली असून खोटे कागदपत्र करणाऱ्यांचे धाबे दणाणले आहे.

प्रांताधिकारी यांना दिलेल्या निवेदनात नागरिकांनी म्हटले आहे की, शासनामार्फत सुरू करण्यात



आलेल्या पहिली ते आठवी साठी मोफत शिक्षणाच्या आरटीई अंतर्गत आमच्या मानूर गावातील शरद पवार इंटरनॅशनल स्कूलमध्ये प्रवेश मिळविण्यासाठी बहुतांश लाभार्थ्यांनी आपल्या निवासाचा खोटा पुरावा जोडून, वैयक्तिक ओळखीच्या आधारे शाळेच्या जवळील मानूर आणि कळवण खुर्द गावात राहत असल्याचे दाखवून नाममात्र भाडे करारनामे करून, बनावट आधार कार्ड, मतदान कार्ड, उत्पन्न दाखला तयार करून आरटीई योजनेत अर्ज दाखल करून शासनाची फसवणूक करतांना गंभीर गुन्हा केला आहे. त्यामुळे आपल्या स्तरावरून संबंधित लाभार्थ्यांनी आरटीई सोडतीसाठी दाखल केलेल्या कागदपत्रांची सखोल चौकशी करावी. आणि आरटीई कायद्याअंतर्गत बनावट कागदपत्रे दाखवून शासनाच्या सोडतीत भाग घेणाऱ्यांवर कारवाई करावी. बनावट राष्ट्रीय कागदपत्र तयार करणारी साखळी शोधून घोटाळा उघडकीस आणावा. दोषींना कडक शासन करावे. जेणेकरून पुन्हा असे खोटेनाटे कागदपत्र कुणी करणार नाही. तसेच गावातील रहिवाशी असूनही आरटीई अंतर्गत प्रवेशासाठी वंचित राहिलेल्या विद्यार्थ्यांना न्याय द्यावा. व सदर प्रवेश प्रक्रिया पुन्हा राबवावी ही विनंती करण्यात आली आहे.

या निवेदन अर्जासोबत ग्रामपंचायतीने गटशिक्षण अधिकारी यांना यापूर्वी दिलेल्या दोन अर्जाच्या प्रती जोडल्या आहेत. निवेदन देताना शेखर पवार, कपिल पवार, बबन पवार, जगन्नाथ पवार, अतुल ठाकरे, रावसाहेब थोरात, रवींद्र पाटील, शशिकांत पवार, योगेश बोरसे आदींसह नागरिक आणि वंचित पालक मोठ्या संख्येने उपस्थित होते.